## ‘भारत २०३६मध्ये ऑलिम्पिकचे यशस्वी आयोजन करेल’



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या १४१व्या सत्राचे उद्घाटन शनिवारी (दि. १४) केले. ४० वर्षांनंतर भारतात ऑलिम्पिक समितीची बैठक होत आहे. या सत्राला आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीचे अध्यक्ष थॉमस बाक, आयओसीच्या सदस्य आणि रिलायन्स फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्ष नीता अंबानी आणि इतर सदस्य उपस्थित आहेत. अधिवेशनाच्या उद्घाटनानंतर झालेल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी ऑलिम्पिकचे आयोजन भारतात करावे, असा थेट प्रस्ताव आयओसी प्रमुख थॉमस बाक यांच्यासमोर ठेवला. भारत आपल्या भूमीवर ऑलिम्पिकचे आयोजन करण्यासाठी उत्साही आहे. भारतात २०३६ साली ऑलिम्पिकचे यशस्वी आयोजन व्हावे यासाठी प्रयत्नांमध्ये आम्ही कोणतीही कमतरता ठेवणार नाही, अशी ग्वाही पंतप्रधान मोदींनी दिली.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ८८
www.ramprahar.com

रविवार, १५ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


जातीच्या दाखल्यांसंदर्भात विधानभवनात बैठक/२

‘रविप्रहर’मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४

कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ जाहीर/८


# वर्ल्डकपमध्ये भारताची विजयी हॅट्‌ट्रिक

## पाकिस्तानवर एकतर्फी मात



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर शनिवारी (दि. १४) झालेल्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतील साखळी सामन्यात यजमान भारतीय संघाने कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तावर एकतर्फी मात केली. या विजयासह भारतीय संघाने सलग तीन विजय पूर्ण केले तसेच गुणतालिकेत अव्वल स्थान पटकाविले.

भारताचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पाकिस्तानचा संघ ४२.५ षटकांत १९१ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात भारताने ३०.३ षटकांत सात गडी राखून १९२ धावा करून सामना जिंकला. रोमहर्षक सामन्याची अपेक्षा असताना भारतीय संघाने पाकिस्तानला डोकेच वर काढू दिले नाही.

वर्ल्डकप स्पर्धेतील पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या शुबमन गिलने धमाकेदार सुरुवात केली, मात्र तो १६ धावा करून बाद झाला. त्यानंतर रोहित शर्मा व विराट कोहली यांनी ५६ धावांची भागीदारी केली. विराट १६ धावांवर बाद झाला, पण रोहित पाकिस्तानी गोलंदाजांना पुरून उरत होता. विराटनंतर आलेल्या श्रेयस अय्यरनेही रोहितसह अर्धशतकी भागीदारी केली. रोहित ६३ चेंडूंत सहा चौकार व तीन षटकारांच्या मदतीने ८६ धावा करून बाद झाला. मग लोकेश राहुल व श्रेयस यांनी संयमी खेळ करून विजय पक्का केला. भारताने ३०.३ षटकांत ३ बाद १९० धावा केल्या. श्रेयस ५३ धावांवर, तर राहुल १९ धावांवर नाबाद राहिला.

तत्पूर्वी जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा व मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ १९१ धावांत तंबूत पाठवला.

### अपराजित परंपरा कायम

भारतीय संघाने एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात पाकिस्तानविरुद्धची विजयी मालिका सुरू ठेवली आहे. भारताचा हा आठवा विजय आहे. या स्पर्धेत भारताचा पाकिस्तानविरुद्ध आजतागायत एकदाही पराभव झालेला नाही.

### रोहित शर्माच्या षटकारांचे त्रिशतक

भारतीय कर्णधार व धडाकेबाज फलंदाज रोहित शर्माने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात दमदार अर्धशतकी खेळी करताना तीन षटकार लगावले. यासह वन डे क्रिकेटमध्ये ३०० षटकार खेचणारा तो जगातील तिसरा आणि पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे.



**मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या १४१व्या सत्रास शनिवारी उपस्थिती लाभली. तत्पूर्वी त्यांचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वागत केले.**

## काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांना वरिष्ठांनी फटकारले

### राहुल गांधींविरोधात बोलल्याने कानउघाडणी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांना पक्षनेतृत्वाने फटकारले आहे. त्यांना पक्षाचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी दिल्लीत पाचारण केले होते. या वेळी त्यांनी वडेट्टीवारांची कडक शब्दांत कानउघाडणी केली.

वडेट्टीवार यांनी राहुल गांधी यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याची माहिती काँग्रेस नेतृत्वापर्यंत पोहचली होती. ही बाब पक्ष नेतृत्वाला आवडली नाही. त्यामुळे वडेट्टीवार यांना दिल्लीत पाचारण करून फटकारण्यात आले. त्यांच्यासोबत महाराष्ट्र काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत हेही होते.

विजय वडेट्टीवार यांनी के. सी. वेणुगोपाल यांच्या कक्षात पाऊल ठेवताच वेणुगोपाल संतप्त होत विचारणा केली की, तुम्ही काय वक्तव्य करीत आहात? राहुल गांधी यांच्याबाबत काय बोलला आहात? त्यानंतर वडेट्टीवार यांनी स्पष्टीकरण देण्यास सुरुवात केली. या वेळी त्यांनी मी राहुल नार्वेकर यांच्याबाबत बोलू इच्छित होतो, परंतु चुकून राहुल गांधी यांचे नाव आले, असे सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. राहुल गांधी यांना भाषण येत नसल्याचे त्यांनी म्हटले होते.

## आरक्षणासाठी मराठा समाज एकवटला

**जालना : प्रतिनिधी**

आरक्षण मिळावे यासाठी जालन्याच्या अंतरवाली सराटीमध्ये शनिवारी (दि. १४) मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाज एकत्र आला होता. या वेळी बोलताना जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाच्या मागण्या मांडल्या.

या सभेला मराठा बांधवांनी गर्दी केली होती. शासनाने १० दिवसांमध्ये मराठा समाजाला आरक्षण जाहीर करावे, अशी मागणी मनोज जरांगे-पाटील यांनी सभेत बोलताना केली. त्याचप्रमाणे मराठ्यांनी मला दिलेला शब्द पाळला. मी त्यांच्या चरणी नतमस्तक आहे, असे म्हणत आभार मानले.

## गुळसुंदे डोंगरीची वाडी येथील ठाकरे गटाचे कार्यकर्ते भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील व उरण विधानसभा मतदारसंघातील गुळसुंदे डोंगरीची वाडी येथील उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. आमदार महेश बालदी यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.



पनवेल तालुका व शहर भाजप मध्यवर्ती कार्यालयात शुक्रवारी (दि. १३) झालेल्या या कार्यक्रमास गुळसुंदे जि.प.विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, माजी सरपंच हरेश बांडे, शांताराम मालुसरे, माजी सदस्य मनोज पवार, गणपत गोठळ, अशोक मालुसरे, प्रभाकर कार्लेकर, मोहन जाधव आदी उपस्थित होते.

या वेळी ठाकरे गटाचे माजी ग्रामपंचायत सदस्य भरत वाघे यांच्यासह सखाराम पवार, यशवंत पवार, लक्ष्मण वाघमारे, गुरूनाथ वाघे, रवी वाघे, धनाजी वाघमारे, धोंडू हिलम, नरेश पवार, मारूती वाघे, गणेश वाघे, महेश वाघमारे, अक्षय वाघमारे, विनेश वाघमारे, अरुण वाघे, चंद्रकांत वाघमारे, आदेश वाघमारे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

गुळसुंदे ग्रामपंचायतीच्या ऐन निवडणुकीत ठाकरे गटाला धक्का बसला असून भाजप अधिक मजबूत झाला आहे.

## प्रकाश जितेकर यांचे सहा वर्षांसाठी निलंबन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पक्षाची बदनामी करण्याचे वर्तन करीत असल्याबद्दल दापोली येथील प्रकाश रघुनाथ जितेकर यांचे भारतीय जनता पक्षातून सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले आहे.

प्रकाश जितेकर हे भाजपच्या विरोधात सातत्याने भूमिका घेऊन आपल्या वर्तनातून पक्षाची प्रतिमा सार्वजनिकरित्या मलिन करण्याचे काम करीत असल्याच्या तक्रारी वारंवार पक्षाकडे येत आहेत. त्या अनुषंगाने या संदर्भात समज देऊनसुद्धा ते पक्षाविरोधात बैठक घेत आहेत. पक्षाच्या विरोधात करण्यात येत असलेल्या वर्तनामुळे उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या शिफारशीनुसार प्रकाश जितेकर यांचे सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले असून त्या संदर्भातील पत्र भाजपचे तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी प्रकाश जितेकर यांना पाठवले आहे.

## निवडक

### इस्रायलवरील हवाई हल्ल्यातील ‘हमास’चा मुख्य सूत्रधार ठार

**जेरुसलेम :** पॅलेस्टाईनमधील दहशतवादी संघटना हमासने इस्रायलवर हल्ला केल्यानंतर दोन्ही देशांत युद्ध पेटले आहे. इस्रायलच्या संरक्षण दलाने शनिवारी (दि. १४) सांगितले की, त्यांनी गाझा पट्टीमध्ये रात्रभर केलेल्या हवाई हल्ल्यात ‘हमास’च्या हवाई गटाचा प्रमुख मुराद अबू मुरादचा खात्मा केला आहे.

### चांद्रयान-३चा डेटा पाहून वैज्ञानिक आश्चर्यचकित

**नवी दिल्ली :** भारताची चांद्रयान-३ ही महत्त्वाकांक्षी मोहीम यशस्वी ठरली आहे. या यानाच्या विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हरने १४ दिवस चंद्रावरची महत्त्वपूर्ण माहिती गोळा केली. या माहितीमुळे जगभरातील शास्त्रज्ञ आश्चर्यचकित झाले आहेत. अमेरिकन रिसर्च प्रोफेसर जेफ्री गिलिस डेव्हिस यांनी एका लेखात या यशाबद्दल तपशीलवार माहिती दिली आहे.

## आजपासून शारदीय नवरात्रोत्सव

### नऊ दिवस होणार देवीचा जागर



**मुंबई : प्रतिनिधी**


आदिशक्तीचा नवरात्रोत्सव रविवारी (दि. १५) घटस्थापना होऊन नऊ दिवस मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. त्यामुळे पूजा साहित्य खरेदीसाठी शनिवारी बाजारात गर्दी दिसून आली.

नवरात्रोत्सवाची व्यापकता वाढत आहेत. पूर्वी ग्रामीण भागात मंदिरात व कुटुंबातील प्रमुख घरांमध्ये घटस्थापना करून हा उत्सव साजरा केला जात असे, तर प्रमुख शहरांमध्ये देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून दांडिया, रास गरबा रंगत असे. हल्ली सर्वच ठिकाणी हा उत्सव साजरा होत असतो. अगदी गावागावांत सार्वजनिक स्वरूपात देवीची स्थापना करून विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि रात्री दांडिया नृत्य होते. यासाठी तयारी पूर्ण झाली आहे.

प्रतिपदेच्या दिवशी घटस्थापना किंवा कलश स्थापना करून दुर्गा देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाईल. १९ ऑक्टोबरला ललिता पंचमीच्या दिवशी ललिता देवीची प्रतिष्ठापना, २१ ऑक्टोबर रोजी महालक्ष्मी पूजन असून त्या दिवशी घागरी फुंकण्याचा कार्यक्रम केला जातो. २२ ऑक्टोबर रोजी दुर्गाष्टमी किंवा महाष्टमीचा उपवास आहे. नवमीला म्हणजेच २३ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्थापन म्हणजेच नवरात्र समाप्ती असून २४ ऑक्टोबर रोजी दसरा आहे.







# खारघरमध्ये तीन दुकाने फोडली

## एकाच रात्री शटर उघडून लाखोंचा माल चोरला

**पनवेल : वार्ताहर**

एका अज्ञात चोरट्यांनी खारघर, सेक्टर १२ मधील तीन दुकानांचे शटर तोडून तिन्ही दुकानातील सुमारे २ लाख रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खारघर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.



खारघर सेक्टर १२ मधील कृष्णा पॅराडाईज इमारतीत अजवा हाऊस ऑफ ड्राय फ्रुट नामक शॉप असून या शॉपमध्ये काम करणाऱ्या कामगारांनी दुकान बंद करण्यापूर्वी दिवसभरातील व्यवहारातील ५८ हजार रुपयांची रोख रक्कम कॅश काऊंटरमध्ये ठेवली होती. त्यानंतर सर्व कामगार घरी निघून गेले होते. मात्र, पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी या शॉपचे शटर उचकटून शॉपमध्ये प्रवेश केला. त्यांनतर शॉपच्या काऊंटर मध्ये असलेली ५८ हजारांची रोख रक्कम चोरली. त्यानंतर या चोरट्यांनी त्याच दुकान लाईन मधील पुमा आऊटलेट या शोरुमचे शटर तोडून त्या दुकानातील तीन दिवसांची जमा झालेली एक लाख ३३ हजाराची रोख रक्कम चोरुन नेली.

यानंतर या चोरट्यांनी त्याचलाईन मधील बिबा या कपड्याच्या दुकानाचे शटर उचकटून या दुकानाच्या काऊंटर मधील १८०० रुपयांची रोख रक्कम चोरुन नेली. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी सदर दुकान उघडण्यासाठी कामगार आल्यानंतर या तिन्ही शॉपमध्ये चोरी झाल्याचे उघडकीस आले. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान, शुक्रवारी पनवेल शहरात चोरट्यांच्या टोळीने पनवेल नगर शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील जवळपास सात तर शहरातील अन्य ठिकाणची पाच दुकाने फोडली. चोरट्यानी दुकानातील लाखो रुपयांची रोख रक्कम लंपास केली.

# डॉ. अरुणकुमार भगत यांच्या मागणीला यश

## पनवेलमध्ये गर्भवतींसाठी मोफत सोनोग्राफी तपासणी सुविधा उपलब्ध

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील गरोदर मातांना मोफतपणे सोनोग्राफी तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली होती. या संदर्भात त्यांनी पनवेल महापालिका आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांना निवेदनही दिले होते. या निवेदनाची दखल घेत पनवेल मनपाच्या माध्यमातून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत प्रत्येक गर्भवतींची १४ ते १८ आठवड्यांमध्ये करण्यात येणारी एक सोनोग्राफी महापालिकेच्या वतीने मोफत करण्यात येत आहेत.

डॉ. भगत यांनी निवेदनामध्ये म्हटले होते की, गरोदर मातांची प्रसुतीपूर्व सोनोग्राफी तपासणी करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असते, परंतु सध्यस्थितीमध्ये पनवेल महापालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये अशी कुठेही सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक गरोदर महिला भगिनींना नवी मुंबई व इतर ठिकाणी जाऊन या सुविधा प्राप्त करून घ्यावी लागते. यामध्ये त्यांचा वेळ व पैसे खर्च होतात व त्यांची मोठी गैरसोयही होत आहे. याबाबत महापालिकेच्या महासभेमध्ये बऱ्याचदा मागणी करूनही अद्यापपर्यंत ही सूविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. तसेच सध्या तिर्थरुप आदरणीय डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल या ठिकाणी सोनोग्राफीचे मशीन आहे, परंतु तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नाही. ही बाब अतिशय गंभीर असून, महापालिकेच्या सर्व प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रामध्ये गरोदर महिलांकरीता सोनोग्राफी सुविधा मोफतपणे सुरू होणे अत्यंत आवश्यक आहे.

यानुसार पनवेल महापालिकेतर्फे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत प्रत्येक गरोदर मातांची १४ ते १८ आठवड्यांमध्ये करण्यात येणारी एक सोनोग्राफी करण्याकरिता खाजगी व शासकीय रेडिओलॉजिस्ट सेंटर यांचेसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

यामध्ये. पनवेल, कंळबोली प्रभागात येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी सिमीरा डायग्नॉस्टीक, खारघर प्रभागांतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी वे टु केअर क्युअर डायग्नॉस्टीक, कामोठे प्रभागांतर्गत येणाऱ्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी क्रिटीकेअर लाईफलाईन रुग्णालय यांची निवड करण्यात आली आहे.

## भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय नवीन पनवेल येथे मुट कोर्ट या विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. प्रतिष्ठित कायदेतज्ञ अ‍ॅड. अभिषेक मतकर यांनी अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी सादरीकरण करत महाविद्यालयातील एलएलबी आणि बीएलएस एलएलबीच्या सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना मुट कोर्ट या विषयावर व्याख्यान दिले.



उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना हा कार्यक्रम विधी व्यवसायात स्वारस्य असलेल्या सर्वांसाठी ज्ञान आणि प्रेरणा देणारा एक मौल्यवान स्त्रोत ठरला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विषय शिक्षक सहाय्यक प्राध्यापक हिमांशू मोरे सर यांनी हा कार्यक्रम आयोजित केला. एडवोकेट अभिषेक मतकर यांनी त्यांच्या या क्षेत्रातील अफाट अनुभवाने उपस्थितांना खटल्याच्या जगात एक उल्लेखनीय प्रवास अवगत करून दिला.

मुट कोर्ट सारख्या विषयावर प्राधान्य मिळवून देण्यासाठी आपल्या व्यवसायातील अनुभव त्यांनी श्रोत्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीएलएस चतुर्थ वर्ष विद्यार्थिनी प्रेरणा गायकवाड यांनी केले. स्वागत पर भाषण सहाय्यक प्राध्यापक हिमांशू मोरे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## विवाहित महिलेच्या इन्स्टाग्रामवर अश्लील फोटो टाकणारा ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात राहणाऱ्या एका विवाहित महिलेच्या इन्स्टाग्राम युजर आयडीवर अश्लील फोटो टाकणाऱ्या युवकास पनवेल शहर पोलिसांनी घेतले ताब्यात आहे.

कॉलेजमध्ये मध्ये शिकणारा हर्षद कुमार परमार (रा. गुजरात) याने पनवेल परिसरात राहणाऱ्या एका विवाहित महिलेच्या इन्स्टाग्राम युसर आयडीवर अश्लील फोटो टाकल्याने या बाबतची तक्रार या महिलेने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक श्रीकांत शेंडगे, हवालदार परेश म्हात्रे, तुषार बोरसे, महिला शिपाई देसाई या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे हा तरुण हा गुजरात येथील नवगाव या ठिकाणी वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तेथून त्याला ताब्यात घेतले आहे.

## कामोठ्यातील हुक्का पार्लरवर कारवाई

### मालकासह तीन वेटर ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे सेक्टर १७ येथील ओम शिवम रेसिडन्सीतील शॉप नं. १३ येथे सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर गुन्हे शाखा कक्ष २ व ३च्या पथकाने कारवाई करून जवळपास आठ हजार १०० रुपयांचा ऐवज हस्तगत केला आहे.

गुन्हे शाखा कक्ष ३ नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग सोनावणे, कामोठे पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक किरण राऊत, गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे उपनिरीक्षक मानसिंग पाटील, गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे उपनिरीक्षक सुनील गिरी, हवालदार सचिन पवार, मधुकर गडगे, सागर रसाळ आदींच्या पथकाने पार्लरवर छापा टाकून दोन हजार रुपये किमतीचे हुक्क्यासाठी लागणारे एक स्टिल व काचेचे पॉटबेस, त्याला स्टिलची प्लेट तसेच २०० रुपये किमतीची एक रबरी पाईप असा एकूण आठ हजार १०० रुपये किमतीचा ऐवज हस्तगत केला आहे.

या प्रकरणी हुक्का पार्लर मालक आकाश भरती (वय २८) यांच्यासह तीन वेटर यांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध व्यापार व वाणिज्य आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनीमयन) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.



पनवेल : ओवे येथील हभप मोहन शिवराम म्हात्रे यांचे रायगड आध्यात्मिक लोकसभा प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, प्रभाकर जोशी आदी उपस्थित होते.

## मोहोपाडा बाजारपेठेतील दुकानात चोरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा बाजारपेठेतील सोनार आळीत असणाऱ्या गणेश वसंत गीध यांच्या श्रीनाथ दुध डेअरी व किराणा दुकानाचे बाथरुमचे ग्रील व दरवाजा तोडून दुकानात प्रवेश करून दुकानातील गल्ल्यातील ५००, २००, १००, ५०, २० व १० रुपये रोख रक्कम असे एक लाख ७५ हजार रुपये अज्ञात चोरट्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेवून लांबविली.

या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यास घटना समजताच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शत्रुघ्न माळी, सबईन्सपेक्टर एम. एम. धोंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात भादंवि ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कळंबोलीतून प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखू जप्त

### कारमधून तस्करी करणारा चालक फरार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कारमधून गुटखा, पानमसाला तसेच सुगंधित तंबाखूचा प्रतिबंधित साठा कळंबोली येथे पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ च्या पोलिसांच्या पथकाने जप्त केला आहे. या वेळी पोलिसांची चाहुल लागल्याने कारचालक फरार झाला आहे, मात्र पोलिसांनी पाच लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कळंबोलीतील खिडुकपाडा येथून एक व्यक्ती गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा कारमधून घेऊन जाणार असल्याची माहिती पोलिस उपआयुक्त परिमंडळ-२च्या अधिपत्याखालील पोलिसांच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने सकाळी पावणेअकराच्या सुमारास खिडुकपाडा गावाकडून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रोडवर सापळा रचला होता. या वेळी सफेद रंगाची संशयित कार खिडुकपाडा रेल्वे स्टेशनकडे जाताना निर्दशनास आल्यानंतर पोलिसांनी त्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. या वेळी संशयिताने एका किराणा स्टोअरसमोर कारमधील दोन गोण्या उतरवल्या होत्या. त्यामुळे पोलिसांनी कारचालकाला पकडण्याचा प्रयत्न केला असता चाहुल लागल्याने तो पळून गेला.

पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. त्याने खिडुकपाडा गावातून पळ काढला, मात्र पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा तसेच तंबाखूचा साठा कारसह जप्त केला आहे.

## केळवणे गावात बिबट्याचे दर्शन



> बिबट्याबाबत जनजागृतीसाठी ठिकठिकाणी बॅनर लावले जात आहेत. केळवणे गावात माहिती देण्यासाठी बैठक घेणार असून गुरे बांधून ठेवावीत, असे आवाहन ग्रामस्थांना करण्यात आले आहे.
>
> -ज्ञानेश्वर सोनावणे, वनक्षेत्ररक्षक, पनवेल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात असणाऱ्या केळवणे गावातील वाघेश्वर पाड्यात भर लोकवस्तीत रहदारीच्या ठिकाणी रात्रीच्या साडेआठ ते नऊच्या सुमारास मुलाला चक्क बिबट्याचे दर्शन झाले. यामुळे गावात भीतीचे वातावरण पसरले आहे तसेच या गावाची वाघेश्वर पाड्याची टेकडीही चिरनेर, कळंबुसरे, दिघाटीच्या जंगलालगतचा परिसर असल्याने वन विभागही सतर्क झाला आहे.

केळवण्याच्या या टेकडीपासूनच हे जंगल सुरू होते. हे जंगल घनदाट असल्याने जंगलात हिंस्र श्वापदांचा पूर्वापार वावर आहे. सध्या जंगलतोड आणि भूमी उत्खननामुळे अनेक जंगली श्वापदे सैरभैर झाली आहेत. अशातच लोकवस्तीच्या परिसरातच श्वापद दिसून येत आहे. अशातच गेल्या दहा-बारा दिवसांपूर्वी केळवणे-खारपाडा मार्गावरील दिघाटी गाव परिसरात बिबट्याचा वावर असल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशातच साधारण ३०० च्या आसपास लोकवस्ती असलेल्या कळवणे वाघेश्वर पाडा परिसरात गुरुवारी (दि. १२) रात्री नऊच्या सुमारास दहा-बारा वर्षांच्या मुलाला दोन घराच्या मधल्या गल्लीत बिबट्या दिसला. त्याने आरडाओरडा केल्यावर बाजूच्या घरातील विनोद घरत या युवकाने आजूबाजूच्या लोकांना सतर्क केले, परंतु बिबट्याने तिथून पळ काढला. त्यामुळे केळवणे गावामध्ये दहशतीचे वातावरण आहे.

## जुन्या साहित्याची विक्री पडली महागात

### सात लाख ८९ हजार रुपयांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

घरातील जुने फर्निचर व इतर साहित्य खरेदीला इच्छुक असल्याचे सांगून एका व्यक्तीची सात लाख ८९ हजारांनी फसवणूक झाली आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

खारघर येथे राहणारे ललितेंदू मोहांती (वय ५७) यांच्यासोबत हा प्रकार घडला आहे. त्यांनी घरातील जुने फर्निचर व इतर साहित्य विक्रीची जाहिरात ओएलएक्स साइटवर टाकली होती. ती पाहून अज्ञात व्यक्तीने त्यांना फोन करून हे साहित्य ३७ हजार रुपयांमध्ये घेण्याचा व्यवहार ठरला होता. त्यानुसार फोनवरील व्यक्तीने पैसे पाठवूनही ते येत नसल्याचे सांगून मोहांती यांना क्यूआर कोड स्कॅन करायला लावले. त्याच्यावर विश्वास ठेवून मोहांती यांनी अनेकदा क्यूआर कोड स्कॅन केल्याने त्यांच्या खात्यातून ७ लाख ८९ हजार रुपये काढले गेले. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर त्यांनी खारघर पोलिसांकडे तक्रार केली असता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पालक शिक्षक बैठक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १४) सकाळी ९ वाजता द्वितीय वर्षीय विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत सोबत संवाद साधण्यासाठी पालक शिक्षक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीसाठी द्वितीय वर्षीय विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रण देण्यात आले होते. या बैठकीसाठी अकाउंट व फायनान्स, बी. एम. एस., कॉमर्स, बीएससी आयटी व शास्त्र विभागातील सुमारे १५० पालक या बैठकीसाठी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित असलेल्या पालकांबरोबर संवाद साधला व सर्वांना महाविद्यालयातील विविध उपक्रमांबद्दल विशेष माहिती देत असताना महाविद्यालयातील सुरू असणाऱ्या विविध कोर्सेस बद्दल तसेच राबविण्यात येणारे शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेले यश, भविष्यामध्ये राबवण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी सर्व विभागाचे विभाग प्रमुख व वर्ग शिक्षकांनी पालकांसोबत संवाद साधला व विविध कोर्सच्या व परीक्षा सत्रांची सविस्तर माहिती दिली त्याचबरोबर पालकांनीसुद्धा आपले विचार मांडले तसेच सर्व शिक्षकांनी पालकांच्या विचारांचे व अपेक्षांचे आदर करीत ते पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यावेळी अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या समन्वयक प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे, अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा, माहिती व तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख प्रा. स्नेहा लोखंडे, बीएमएस विभाग प्रमुख प्रा. डॉ. रीत ठुले, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. फारुख शेख व सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीचे आयोजन शिक्षक पालक संघटनेच्या समन्वयक प्रा. तनुजा सुमन (कॉमर्स विभाग) व प्रा. रिजवाना मोमीन (विज्ञान विभाग) यांनी केले तसेच सर्व विभाग प्रमुख सर्व शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## रोटरी कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नमेंट रोटरीयन मंजू फडके यांच्या हस्ते रीस येथीस गुड हेल्थ हॉस्पिटल तळ मजल्यावर रोटरी कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन झाले.




अध्यक्ष रेश्मा कुरूप यांनी माहिती दिली की, या केंद्रात वंचित मुली आणि मुलांना टेलरिंग, ब्युटीशियन, मेणबत्ती बनवणे, एमएससीआयटी कोर्स, नर्सिंग कोर्स आणि इतर अनेक कोर्सेस उपलब्ध करून देणार आहोत. कौशल्य विकास कार्यक्रम हे वंचित समुदायांना सशक्त बनवण्यासाठी आणि त्यांना स्वतःसाठी एक चांगले भविष्य निर्माण करण्यासाठी सक्षम करण्यासाठी एक शक्तिशाली साधन आहे.

हा एक अत्यंत शाश्वत आणि परिणामकारक प्रकल्प आहे जो अनेकांच्या जीवनाला स्पर्श करेल आणि बदल घडवेल. या कार्यक्रमाला अध्यक्ष रोटेरीयन रेश्मा कुरूप, सचिव सुशांत उचील, गणेश म्हात्रे, सुनील कुरूप, डॉ. लेख उचील, सुनील भोसले, रुतुजा भोसले, गणेश मेणसे, प्रकाश गायकवाड, विजय पाटील, प्रतीक्षा कुरंगळे, शशिकांत शानभाग, अन भारती म्हात्रे, उषा मेणसे, जयश्री पाटील, रेवती गायकवाड, समिधा थोरात, रोटरी क्लब ऑफ पेणच्या अध्यक्षा मधुबाला, संयोगिता टेमघरे, जयेश, अपर्णा मोरे, सारिका साळवी आदी उपस्थित होते.

### हा आहे उद्देश

**आजच्या जगात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी योग्य कौशल्ये असणे आवश्यक आहे. वंचित समुदायातील अनेक व्यक्तींना ही कौशल्ये विकसित करण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण आणि शिक्षण उपलब्ध नाही. या समुदायांना सक्षम बनवण्यात आणि त्यांना स्वतःसाठी एक चांगले भविष्य घडवण्यासाठी व सक्षम बनविण्याचा या केंद्राचा उद्देश आहे.**

# 'कुछ कुछ होता है' @ २५

## प्रेम त्रिकोणाची गोष्ट 'अंदाज'पासूनची

झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

'कुछ कुछ होता है'च्या पंचवीशीच्या निमित्ताने सांगावं तेवढं थोडं... याची पेरणी सुरजकुमार बडजात्या दिग्दर्शित राजश्री प्रॉडक्शनच्या 'हम आपके है कौन'ने झाली. (एचएएचके चित्रपटाचा शॉर्टफॉर्म नव्वदच्या दशकाचे देणं) मला आठवते १९९५च्या ऑगस्ट महिन्यात 'हम आपके...'च्या आगमनाचे वातावरण निर्माण होत होतं. आम्हा चित्रपट समीक्षकांना वेगळा शो आयोजित करण्यापेक्षा राजश्री प्रॉडक्शनच्या वतीने लिबर्टीमधील पहिल्या दिवसाच्या सेकंड शोचं तिकीट दिलं होतं. खरंतर संपूर्ण मुंबईमध्ये फक्त आणि फक्त लिबर्टीतच हा चित्रपट प्रदर्शित होत होता.

थिएटरवर पोहचताच दोन गोष्टींनी माझं लक्ष वेधून घेतलं. एक म्हणजे थिएटर डेकोरेशन. हा फंडा काही तसा आपल्याकडचा नवीन प्रकार नाही. ती पूर्वापार चालत आलेली पब्लिकला हवीहवीशी अशी संस्कृती, परंतु नंतर नंतर न कुठेतरी विशेषतः १९८२ साली देशात व्हिडीओ आल्यानंतर ज्या पद्धतीने चित्रपटगृहावरच्या गर्दीला ओहोटी लागली आणि त्या तडाक्यामध्ये लिबर्टी सापडलं आणि त्यानंतर लिबर्टीला काही नवे जुने इंग्रजी चित्रपट नि इतर वाय झेड कल्चरचे म्हणतो तसे चित्रपट प्रदर्शित झाल्याने लिबर्टीच्या मूळ कल्चरला, इमेजला धक्का लागला.

'हम आपके...' रिलीज होत असताना मात्र ते अतिशय चांगल्या पद्धतीने सुशोभित करून एक चांगली सकारात्मक वातावरण निर्मिती केलेली. कौटुंबिक सिनेमासाठी पूरक असा तो सगळा माहौल जाणवला आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्याचे तिकीट दर आश्चर्य वाटावे असे चढे होते. मलाही पूर्वपार म्हणजे 'स्टॉलचा पब्लिक' म्हणून पिक्चर एन्जॉय करायला थिएटरवर गेलो की एक सवय अडव्हान्स बुकिंगला त्या चित्रपटासाठी रिस्पॉन्स किती आहे बघूया. त्याचा मला व्यक्तिशः फायदा तो काही नाही, पण त्या काळातील पिक्चरची क्रेझ काही वेगळीच.

लिबर्टीला बघतो तर 'हम आपके' यासाठी सोमवार ते शुक्रवार पंचाहत्तर रुपये वगैरे तिकीट दर. शनिवार-रविवार तर शंभर रुपये वगैरे. असे फार चढे दर असले तरी पिक्चर हिट होताच तेही परवडतात...

१९९५च्या दिवाळीत यशराज फिल्मचा आदित्य चोप्रा दिग्दर्शित 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' प्रदर्शित झाला ('डीडीएलजे' असं तेव्हाच्या यंगस्टर्सच्या भाषेत) आणि त्याने 'हम आपके...'ने निर्माण केलेल्या वातावरणामध्ये भर घातली.

आपल्या देशामध्ये नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीला जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था यांचे वारे आले आणि वातावरणामध्ये बदल होत होता. कॉर्पोरेट संस्कृती रूजत होती. शहरांमध्ये नवश्रीमंत आणि उच्चभ्रू वर्गाची वाढ होती. चलती होती आणि महागडे ते चांगलं असा कुठेतरी एक सामाजिक फील येत होता. त्यालाच 'डीडीएलजे'ने एक सपोर्ट सिस्टीम निर्माण केली. मग आला १९९७च्या दिवाळीमध्ये यशराज फिल्मचा यश चोप्रा दिग्दर्शित 'दिल तो पागल है' अर्थात 'डीटीपीएच'. हाही सिनेमा नवश्रीमंत आणि उच्चभ्रू वर्गाच्या रिस्पॉन्सवर हिट. फ्लॅशबॅकमध्ये डोकावलं, निरीक्षण केलं तर दिसत आपल्या देशात सिनेमा मध्यम आणि कनिष्ठ मध्यमवर्गाने, स्वप्नाळू, आशावादी, मेहनती, कष्टकरी, काहीशा भाबड्या वर्गाने वाढवला... तोच सिनेमा आता महागड्या तिकीट दराच्या रसिकांकडे वळत होता. म्हटलं ना, या सगळ्याची सुरुवात वा पेरणी झाली होती ती 'हम आपके है कौन ने'! आता सिनेमा हा गरिबांचा सपनो का सौदागर न राहता श्रीमंतांची ती चैन, फॅशन होऊ लागला होता आणि त्यातच दिवाळीला रिलीज होणारे चित्रपट असा आणखी एक फंडा योगायोगाने तयार झाला आणि त्याच्यातील एक हुकमी स्टार शाहरूख खान... एसआरके आणि दिवाळी रिलीज हाही एक ट्रेण्ड. त्यात आता १९९८च्या दिवाळीमध्ये कुछ कुछ होता है (केकेएचएच) हा धर्मा प्रोडक्शनचा यश जोहर दिग्दर्शित चित्रपट आणि त्याचेही मेन थिएटर होतं ते लिबर्टीच! एव्हाना लिबर्टी हे अशा चकाचक आणि श्रीमंत सिनेमासाठीच एक महत्त्वाचा स्पॉट ठरू पाहत होतो.

आम्हा समीक्षकांना 'केकेएचएच'चे लिबर्टीचेच पहिल्या दिवशीचे तिकीट दिले. म्हणजे प्रेक्षकांबरोबर सिनेमा पाहताना तुम्हाला काहीतरी एक फील येईल. एक वेगळं वातावरण अनुभवता येईल आणि चित्रपटाला रसिकांचा कसा रिस्पॉन्स मिळेल याचासुद्धा अनुभव येईल असा त्यामागचा एक हेतू असे, पण लिबर्टीचा प्रेक्षक हा चार चाकी गाडीतून येणारा असा, ज्याला थिएटरमधला समोसा, पॉपकॉर्न, आईस्क्रीम सहजी परवडतो... काहीजण ते खाण्यात जास्त रस घेतात ते जाऊ देत.

'केकेएचएच'देखील विदेशामध्येच घडतो. लव ट्रँगल. एक प्रियकर दोन मैत्रिणी असा फॉर्म्युला. याचा तो टोन मात्र इमोशनपेक्षा श्रीमंती थाटमाटाचा जास्त जाणवला. श्रीमंतांना दुःख नसते असे नाही. त्यातही ते मेकअप आणि मुखवटा सांभाळतात म्हणून ते दिसत नाही, आपल्यापर्यंत पोहचत नाही. करण जोहरचा हा दिग्दर्शनातील पहिला चित्रपट. एक कार्पोरेट युगाचा, अतिशय प्रोफेशनल व फोकस्ड दिग्दर्शक जन्माला आला. (त्याचीही पंचवीशी झाली हो) करण जोहरने 'डीडीएलजे'मध्ये राज म्हणजे शाहरूखच्या मित्राची भूमिका साकारली होती. त्याच वेळेला तो आदित्य चोप्राकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही भूमिका आठवत होता, दिग्दर्शन शिकत होता. निर्माते यश जोहर यांचा हा मुलगा. यश जोहर फार पूर्वी नवकेतन फिल्ममध्ये प्रोडक्शन कंट्रोल होते. 'गाईड', 'ज्वेल थीफ' पुन्हा पुन्हा पाहताना यश जोहर यांना पडदाभर एकच नाव असे स्थान दिल्याचं दिसेल. यश जोहर कालांतराने चित्रपट निर्माते झाले. त्यांनी धर्मा हा प्रोडक्शन स्थापन केलं आणि राज खोसला दिग्दर्शित 'दोस्ताना'ला यश मिळाल्यानंतर त्यांची एक यशस्वी वाटचाल सुरू झाली. त्यानंतर महेश भट्ट दिग्दर्शित 'गुमराह', 'ड्युप्लिकेट' इत्यादी चित्रपटांची निर्मिती केली. आता खुद्द त्यांचा मुलगा करण जोहर हा नव्या पिढीचा नवा दिग्दर्शक.


















ही पिढी ही एकीकडे चांगले पैसे मिळवण्याबाबत फोकस, काहीजण विदेशी शिक्षण, मग नोकरी आणि जमलचं तर स्थायिक अशा विचाराची, दुसरीकडे वीकेण्ड ट्रीप, चंगळवादी, एव्हाना एम टीव्ही कल्चर रूळलं होते, मॉल मल्टीप्लेक्स युग येऊ घातलं होतं. या दशकातील युवा पिढीला चकाचक चित्रपट आवडत होते. त्याच शैलीतला 'कुछ कुछ होता है' १६ ऑक्टोबर १९९८ रोजी मुंबईमध्ये लिबर्टी आणि इतर काही चित्रपटगृहांत प्रदर्शित झाला. त्याला पंचवीस वर्ष पूर्ण होत आहेत. पंचवीस वर्षांनंतर आजही करण जोहर, शाहरूख खान, काजोल आणि राणी मुखर्जी हे त्याच उत्साहात कार्यरत आहेत, फोकसमध्ये आहेत.

राहुल शर्मा (शाहरूख खान) आणि अंजली (काजोल) हे एकाच कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतात. राहुल फ्लर्ट करण्यात किंवा तरुणींवर इम्प्रेशन मारण्यात रस घेणारा. त्याच कॉलेजमध्ये टीना मल्होत्रा (राणी मुखर्जी) शिकण्यासाठी येथे आणि त्याच्यातून लव ट्रँगल आकाराला येतो. म्हणजे अंजलीचे राहुलवर प्रेम आहे, परंतु राहुलला त्याची कल्पना नसते. राहुल तिला आपली मैत्रीण समजत असतो, तर राहुल आणि टीना यांचे मात्र प्रेम जुळतं, सूर जुळतात आणि एक नवं नातं निर्माण होते आणि मग अशाच नाट्यातून निर्माण होणारा जो काही पेच आहे तो चटपटीत संवाद, विनोद, गीत, संगीत, नृत्य याची चकाचक मेजवानी म्हणजे 'कुछ कुछ होता है'. चित्रपटात सलमान खान अमर मेहराच्या भूमिकेत आहे. फरिदा जलाल, अनुपम खेर, अर्चना पुरणसिंग, रिमा लागू, हिमानी शिवपुरी, जॉनी लिव्हर, फरजाद दस्तूर, पाहुणी कलाकार म्हणून नीलम इत्यादी कलाकार आहेत. टीना मल्होत्राच्या व्यक्तीरेखेसाठी ट्विंकल खन्ना नक्की झाली होती. अचानक तिने माघार घेतल्याने रानी मुखर्जीला मोठीच संधी मिळाली. चित्रपटाची मोठी जमेची बाजू होती गीत-संगीत.

समीरच्या गीताला जतिन ललितचे संगीत. ही जोडी नव्वदच्या दशकातील एक आघाडीचे संगीतकार म्हणून तरुण पिढीत लोकप्रिय. व्हिडीओ एव्हाना एस्टॅब्लिश झाला होता, चॅनलचं जग रूजले होते, इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा प्रभाव वाढत होता आणि अशा वेळेला 'कुछ कुछ होता है'ची गाणी रसिकांसमोर आली आणि ही गाणी हिट व्हायला अजिबात वेळ लागला नाही. क्या करू हाये कुछ कुछ होता है (उदित नारायण, अलका याज्ञिक), कोई मिल गया (उदित नारायण, अलका याज्ञिक व कविता कृष्णमूर्जी), साजन जी घर आये ( कुमार सानू, अलका याज्ञिक, कविता कृष्णमूर्ती), ये लडका है दीवाना (उदित नारायण, अलका याज्ञिक), तुझे याद ना आये तेरी आई (उदित नारायण व अलका याज्ञिक), लडकी बडी अंजानी है (कुमार सानू व अलका याज्ञिक). एकापेक्षा एक लोकप्रिय गाणी आणि ज्या चित्रपटाची गाणी लोकप्रिय त्या चित्रपटाला रिपीट व्हॅल्यू निश्चित आणि आता तर शाहरूख खान सुपरस्टार होता, त्याचे युग सुरू झालेले त्याचा स्वतःचा एक ऑडियन्स तयार झालेला आणि शाहरूखच्या रोमँटिक सिग्नेचर पोझवर तरुणाई विलक्षण फिदा. आपली ही स्टाईल त्याने अनेक चित्रपटांमध्ये अतिशय मनसोक्तपणे वापरली (त्यावर त्याचीच मालकी असल्यावर काय हो) आता कार्पो रेट युगात आपण आलो होतो. मार्केटिंग फंडा फार महत्त्वाचा होता. 'एसआरके' त्यात एक्स्पर्ट. एव्हाना जग बदलत होतं. भारताबरोबरच विदेशातही मोठ्या प्रमाणावर चित्रपट प्रदर्शित होत होते. त्याची वाढ 'हम आपके...'ने झाली आणि 'दिलवाले दुल्हनिया...'ने त्याला एक मोठा चांगला टेकऑफ दिला. शाहरूखवर जगभरातील फिल्म मीडिया फोकस टाकत होता.

प्रेम त्रिकोणाचा फॉर्मुला हिंदी सिनेमाला नवीन नाही. मेहबूब खान दिग्दर्शित 'अंदाज' (१९४९) त्यात मास्टरपीस. राज कपूर नर्गिस आणि दिलीप कुमार यांच्या तिघांच्या जबरदस्त अभिनयासाठी 'अंदाज' कायमच ओळखला जातो. दिलीप कुमारचा राजन खलप्रवृत्ती ठसा असलेला. नौशादच्या संगीतामधील आजही म्हणजे जवळपास पंचाहत्तर वर्षे होत आली तरी हिट. युट्युबवर हा चित्रपट उपलब्ध असेल, तर आजच्या पिढीने त्याचा आस्वाद जरूर घ्यावा. अभिनय कसा करावा यासाठी हा चित्रपट मार्गदर्शक.

राज कपूर दिग्दर्शित आणि आर. के. फिल्मचा पहिला रंगीत चित्रपट संगम (१९६४) लव्ह ट्रँगलच. सुंदर (राज कपूर), राधा (वैजयंतीमाला) आणि गोपाल (राजेंद्र कुमार) या तीन प्रमुख व्यक्तीरेखांभोवतीचा चार तासांचा आणि देशातील पहिला दोन मध्यंतर असलेला असा हा चित्रपट. सुंदर आणि गोपाल यांची मैत्री आणि राधा प्रेमाचा तिसरा कोन. पटकथेत अनेक चढउतार. समज-गैरसमज. गोपालचे राधाशी लग्न होते आणि गोपाल यांच्या मैत्रीची कसोटी लागते. गोपाल व राधाचंही प्रेम होतेच की. प्रेमामधला संघर्ष, त्यातलं नाट्य, त्यात बहारदार गीत, संगीत, नृत्य आणि युरोपीय देशातील चित्रीकरण. पिक्चर सुपर हिट.

रमेश सिप्पी दिग्दर्शित 'सागर' (१९८५)चा लव ट्रँगलही बहुचर्चित ऋषी कपूर डिंपल कापडिया आणि कमल हसन या तीन प्रमुख व्यक्तीरेखा. समुद्रकिनाराच्या कोळीवाड्यातील राजा (कमल हसन) आणि मोना डिसिल्वा (डिंपल) हे लहानपणापासूनचे चांगले मित्र, तर विदेशातून आलेला रवि (ऋषी कपूर) याचं प्रशस्त घर या कोळीवाड्याच्या नजीकच. तो एका भल्या पहाटे समुद्रकिनारी मोनाला पोहताना पाहतो आणि तो तिच्या प्रेमात पडतो. तेथून त्यांची प्रेम कथा सुरू होते. इकडे रवि आणि राजा यांची मैत्री घट्ट होत जाते. एक दिवशी राजाच्या लक्षात येते की रवि व मोना एकमेकांच्या प्रेमात आहेत, पण आपल्या लहानपणापासूनच्या मैत्रिणाला आपलं प्रेम कसे लक्षात आले नाही? याचेही राहुल देव बर्मनचे संगीत आजही लोकप्रिय.

लॉरेन्स डिसोझा दिग्दर्शित आणि सुधाकर बोकाडी निर्मित 'साजन'चा (१९९१) प्रेम त्रिकोणही असाच बहुचर्चित. संजय दत्त, माधुरी दीक्षित आणि सलमान खान या तीन प्रमुख व्यक्तिरेखांभोवतीचा प्रेम त्रिकोण. अमन (संजय दत्त) हा दिव्यांग आहे आणि त्याला आकाश वर्माच्या (सलमान खान) कुटुंबात विशेष स्थान आहे. अमन हा सागर नावाने लोकप्रिय कवी आहे. त्याच्या कवितांवर फिदा असलेली पूजा (माधुरी दीक्षित) हिचे सागरला लिहिलेले पत्र आकाशला मिळते आणि तोच पूजाला सागर म्हणून भेटतो. त्यांच्यात प्रेम होते, पण पूजाला वस्तुस्थिती समजल्यावर नाट्य निर्माण होते. याचेही नदीम श्रवण यांचे संगीत आजही लोकप्रिय. प्रेमपटाला श्रवणीय संगीताचा बुस्टर डोस हवाच.

हिंदी सिनेमातील लव्ह ट्रँगलच्या गोष्टी अनेक. राज खोसला दिग्दर्शित 'प्रेम कहानी', धर्मेश दर्शन दिग्दर्शित 'धडकन', सुनील हिंगोरानी दिग्दर्शित 'राम अवतार' वगैरे वगैरे. गाजलेल्या लव ट्रँगलमध्ये नाव घ्यायची तर मेहबूब खानचा 'अंदाज', राज कपूरचा 'संगम', रमेश सिप्पीचा 'सागर', लॉरेन डिसोजाचा 'साजन' आणि करण जोहरचा 'कुछ कुछ होता है' हे टॉप फाईव्ह लव ट्रँगल आणि म्हणूनच तर 'कुछ कुछ होता है'ला पंचवीस वर्षे झाल्यानिमित्ताने त्याच्यावर एक विशेष फोकस टाकलाच पाहिजे. या यशाने शाहरूख खान आणि करण जोहर जोडी त्यानंतर जमली आणि त्यांनी 'कभी खुशी गम' ( २००१), 'कभी अलविदा ना कहना' (२००६), 'माय नेम इज खान' (२००९) , 'यह दिल है मुश्किल' ( २०१६) अशा आणखी काही चित्रपटांमध्ये चित्रपटासाठी ही दिग्दर्शक आणि सुपरस्टार अशी जोडी एकत्र आली. शाहरूख खानने नेहमीच चित्रपटाची निवड करताना त्याचा दिग्दर्शक, त्या दिग्दर्शकाचे व्यावसायिक स्थान याला फारच महत्त्व दिले आणि ते करण जोहरला नक्कीच आहे. पटो न पटो करण जोहरने त्यानंतर खरोखरच मागे वळून पाहिलेलं नाहीये. मग ते चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन इतकंच नव्हे तर छोट्या पडद्यावरील कॉफी विथ करण शो, इव्हेन्टस निवेदन आणि इतर बरंच काही करत करत त्याने स्वतःचा एक्सप्लोजर वाढवला, स्वतःचा एक ऑडियन्स तयार केला, इमेज तयार केली. या सगळ्याची पाळमुळं ही पंचवीस वर्षांपूर्वी 'कुछ कुछ होता है'मध्ये रूजली. सिनेमा रिलीज झाला आणि पहिल्या शोपासूनच चित्रपटाला रसिकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यात जास्त भरणा मात्र नवश्रीमंत आणि उच्चभ्रू वर्गाचा होता. समाजामध्ये बदल होत होता. हिंदी सिनेमा बदलत होता आणि त्याच टप्प्यावरचा एक महत्त्वाचा रोमॅन्टीक चित्रपट म्हणजे 'कुछ कुछ होता है' अर्थात केकेएचएच!

---

# शारदीय नवरात्रोत्सव



शारदीय नवरात्रोत्सव अश्विन महिन्यात साजरा केला जातो, ज्यामध्ये नऊ दिवस देवी दुर्गेच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवस हा दुर्गादेवीचा उत्सव असतो. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापना केली जाते हा एक विशेष विधी आहे. यंदा आजपासून घटस्थापना करून नवरात्रोत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया नवरात्रोत्सवाबद्दल...

नवरात्राचा उत्सव हा एक कुलाचारही असल्याने त्यामध्ये विविधता दिसून येते. पहिल्या दिवशी घटस्थापना करतात. लहानशा मातीच्या ढिगावर गहू पेरून त्यावर मातीचा घट ठेवतात. घटावर देवीची स्थापना करतात. घटस्थापनेचा संबंध हा थेट शेतकऱ्यांशीही येतो. घटस्थापना म्हणजे बीजपरीक्षण होय. आपल्या शेतात आपण जी पिके पिकवतो आणि ज्यातून आपले पोट भरते त्याप्रति श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा उत्सव म्हणजे नवरात्र. नवरात्रीच्या दरम्याने शेतातील पिके तयार झालेली असतात, तर काहींच्या पिकांची कापणी झालेली असते. आपल्या घरामध्ये नवीन धान्य आलेले असते. घटस्थापनेच्या वेळी घटासमोर आपण आपल्या शेतातील माती आणतो. त्या मातीमध्ये हे नवीन धान्य आपण पेरतो. दसऱ्यापर्यंत म्हणजे नऊ दिवसात ते धान्य त्या घटासमोर उगवते. या नऊ दिवसात आदिमाया, आदिशक्तीची उपासना करताना आपल्या शेतातील धान्यांचीही आपल्याकडून पूजा केली जाते. कित्येक ठिकाणी घटावर तांत्रिक यंत्राचीही स्थापना करतात. नऊ दिवस देवीची पूजा करतात. रोज माळ बांधणे, कुमारीचे पूजन करणे, अखंड दीप लावणे, उपवास करणे, सप्तशतीचा पाठ करणे, ब्राह्मण-सुवासिनींना भोजन घालणे इ. विविध आचार वेगवेगळ्या कुळांत पाळले जातात.

पौराणिक कथेनुसार शारदीय नवरात्रीनंतरच भगवान रामाने रावणावर विजय मिळवला आणि रावणाचा वध केला. म्हणून दसऱ्याच्या दिवशी रावणाचे दहन केले जाते. त्याचप्रमाणे अश्विन महिन्यात देवी दुर्गेने महिषासुर नावाच्या राक्षसाशी नऊ दिवस युद्ध केले व दहाव्या दिवशी त्याचा वध झाला. म्हणून नऊ दिवस दुर्गादेवी शक्तीच्या रूपात पूजली जाते. नवरात्रीच्या नऊ दिवसांत देवीच्या मंदिरात भाविकांची गर्दी ओसंडून वाहते. महिला देवीची खणा नारळाने ओटी भरतात. काही देवीभक्त घरोघरी जाऊन जोगवा मागतात.

नवरात्रीच्या निमित्ताने सार्वजनिक मंडळात गरब्याचे आयोजन केले जाते. बायका, मुले भोंडल्याचेही आयोजन करतात. यामध्ये एका पाटावर हत्ती काढून त्याच्या अवतीभवती फेर धरला जातो आणि भोंडल्याची गाणी म्हणतात. आपापल्या घरून खाण्याच्या ज्या वस्तू डब्यात आणल्या जातात त्या शेवटी ओळखायच्या आणि एकत्र करून खायच्या असा भोंडला रंगतो.

नवरात्रीच्या नऊ दिवसात एक आगळा वेगळा उत्साह असतो. अखंड नऊ दिवस देवीची मनोभावे सेवा, पूजा, आरती केली जाते. वेगवेगळे नैवेद्य दाखवले जातात. नवरात्रीच्या नऊ दिवशी देवी आईला वेगवेगळ्या रंगाच्या साड्या नेसवतात. मनोभावे देवीआईची उपासना आरती केली जाते. काही लोक नऊ दिवस अनवाणी राहतात, तर काही लोक निराहार उपवास करतात. नऊ दिवसानंतर अश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी म्हणजेच दसरा असतो. **(साभार : इंटरनेट)**

### यंदाच्या नवरात्रीचे नवरंग

दिवस पहिला (१५ ऑक्टोबर) : रंग केशरी
दिवस दुसरा (१६ ऑक्टोबर) : रंग पांढरा
दिवस तिसरा (१७ ऑक्टोबर) : रंग लाल
दिवस चौथा (१८ ऑक्टोबर) : रंग निळा
दिवस पाचवा (१९ ऑक्टोबर) : रंग पिवळा
दिवस सहावा (२० ऑक्टोबर) : रंग हिरवा
दिवस सातवा (२१ ऑक्टोबर) : रंग राखाडी
दिवस आठवा (२२ ऑक्टोबर) : रंग जांभळा
दिवस नववा (२३ ऑक्टोबर) : रंग मोरपंखी

# पोलादपुरात खैराची अवैध वाहतूक

## * ट्रकसह सहा लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त

## * वनउपज तपासणी नाक्यावर धडक कारवाई


(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील पोलादपूर येथील वनउपज तपासणी नाक्यावर एका ट्रकच्या झडतीमध्ये साधारणपणे १० हजार ४३३ रूपये किंमतीचे खैरतोडीच्या तुकडयांचे ७७ नग ट्रकसह जप्त करण्यात आल्याची माहिती डिएफओ रोहा अप्पासाहेब निकत यांच्यामार्फत देण्यात आली आहे.

वनउपज तपासणी नाका पोलादपूर येथे एसीएफ रोहा विश्वजित जाधव यांच्याकडील गुप्तमाहितीनुसार चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक (एमएच ११ एएल २०५०)ची तपासणी वनविभागाच्या स्थानिक स्टाफमार्फत करण्यात आली असता त्या ट्रकमध्ये खैराचे १०हजार ४३३ रूपये किंमतीचे ७७ तुकडे आढळून आले. या वेळी हा बिनपासी मुद्देमाल आढळून आल्याबद्दल ट्रकचालक विजय महादेव मांजरेकर (रा. शिरगांव, ता. चिपळूण) व इतर चार इसम यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करून ट्रक (एमएच ११ एएल २०५०) हा सहा लाख रूपयांचा मुद्देमालही खैराच्या तुकड्यांसह जप्त करण्यात आला.

कारवाई करताना स्थानिक स्टाफ प्रभारी वनपाल पोलादपूर संदीप परदेशी, वनउपज तपासणी नाका पोलादपूर नवनाथ मेटकरी, सचिन मेने, निलेश नाईकवाडे, वनरक्षक प्रियांका जाधव, अमोल रोकडे, वाहनचालक लोखंडे सहभागी होते.

# एप्रिल ते सप्टेंबरदरम्यान मध्य रेल्वेला विक्रमी महसूल प्राप्त



**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचा एप्रिल ते सप्टेंबर २०२३मध्ये विक्रमी एकूण महसूल ८,५६८.४१ कोटी रुपये प्राप्त झाले आहे. जो एप्रिल ते सप्टेंबर २०२२ मधील ७,३९५.१८ कोटी रुपयांच्या तुलनेत १५.८६ टक्के जास्त आहे. मध्य रेल्वेने वाणिज्यिक महसुलात सातत्यपूर्ण आपली सर्वोत्तम कामगिरी देण्याची गती कायम ठेवली आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत म्हणजेच एप्रिल ते सप्टेंबर २०२३-२४ या कालावधीत मध्य रेल्वेने ८,५६८.४१ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला आहे. जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील ७,३९५.१८ कोटी रुपयांच्या तुलनेत १५.८६ टक्के अधिक आहे.

मध्य रेल्वेने सप्टेंबर-२०२३ दरम्यान मालवाहतुकीतून ६०९.५० कोटी रुपयांचा महसूल मिळवला आहे. जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील ५७१.०५ कोटी रुपयांच्या तुलनेत ६.७३ टक्के अधिक आहे. मध्य रेल्वेने सप्टेंबर-२०२३ दरम्यान प्रवासी वाहतुकीतून ५७४.४३ कोटी रुपयांचा महसूल मिळवला आहे. जो मागील वर्षीच्या तुलनेत ८.८४ टक्के अधिक आहे. मध्य रेल्वेने सप्टेंबर-२०२३ दरम्यान इतर कोचिंग महसूल ६५.०६ कोटी रुपये मिळवला आहे. जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील ६३.७१ कोटी रुपयांच्या तुलनेत २.१२ टक्के अधिक आहे.

मध्य रेल्वेने सप्टेंबर-२०२३ दरम्यान विविध महसूल ३३.३१ कोटी रुपये मिळवला आहे. जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील ३७.०८ कोटी रुपयांच्या तुलनेत १०.१७ टक्के कमी आहे. विविध महसूल म्हणजे नॉन-फेअर रेव्हेन्यू, (एनएफआर), पार्किंग, केटरिंग, रिटायरिंग रूम इत्यादींमधून मिळणारा महसूल आहे.

मध्य रेल्वेने उत्पन्नाला चालना देण्यासाठी विभागांवर बिझनेस डेव्हलपमेंट युनिट्स (बीडीयू) ची स्थापना, भाडे-व्यतिरिक्त महसूल उपक्रम, सघन विपणन आणि इतर तत्सम नाविन्यपूर्ण कल्पनांसह मुख्यालयातील विविध उपक्रमांमुळे महसुलात वाढ झाली आहे.

# अलिबागमध्ये वॉक फॉर फ्रीडम उत्साहात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग येथे शनिवारी (दि. १४) मानवी तस्करीबद्दल जनजागृती करण्यासाठी कॉर्पोरेट, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांमधील २५०हून अधिक नागरिकांनी वॉक फॉर फ्रीडममध्ये सहभाग घेतला.

वॉकचे उद्‌घाटन जेएसएम लॉ कॉलेजच्या प्राचार्या ॲड. निलम हजारे यांच्या हस्ते करण्यात आले. वॉकच्या सुरुवातीला रायगड आणि देशभरातील सहभागींनी त्यांच्या हयातीत तस्करी थांबवण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करण्याची शपथ घेतली. त्यानंतर ते मानवी तस्करीची माहिती आणि आकडेवारी असलेले फलक हातात घेऊन जेएसएम लॉ कॉलेज ग्राउंड रायगड येथून परिसरातील सार्वजनिक रस्त्यावरून परत आले. तसेच मानवी तस्करीला बळी पडलेल्या आवाजहीन व्यक्तींसाठी एकजुटीने येऊन पूर्णपणे हा एक मूक व शांतीप्रिय वॉक होता.

वॉक फॉर फ्रीडममध्ये सहभागी होण्याचे हे रायगडचे पहिले वर्ष आहे आणि शहरातील महाविद्यालये, कॉर्पोरेट्स आणि नागरी समाजातील सदस्यांच्या एकत्र येण्यामुळे हे शक्य झाले आहे. सहभागी संस्थांमध्ये लीड बाय महाराष्ट्र स्टेट लीगल सर्व्हिस ऑथोरिटी,



एनजीओ व्हीजन रेस्क्यू, जेएसएम लॉ कॉलेज अलिबाग, जेएसएम कॉलेज बीएससी आदींचा समावेश होता.

ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजचे चेअरमन ॲड. गौतम भाई पाटील यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले तसेच ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजच्या प्राचार्या ॲड. निलम हजारे, जेएसएम कॉलेजचे प्राचार्य अनिल पाटील, प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे प्रा. कैलास सर व पल्लवी पाटील मॅडम, नंदकुमार पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच ॲड. लॉ कॉलेज व जेएसएमचे प्राध्यापक, व्हिजन रेस्क्युच्या टीम लीडर केतकी मंदा नंदकुमार पाटील इतर कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते, त्याचप्रमाणे प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजचे अनिकेत मोरे, मैथिली भगत, चैतन्य पाटील, भाग्यश्री शिंदे, अक्षया गोसावी, मानव टेमकर, आर्य पाटील, जयेश पवार, चैत्रवी माईनकर, श्रध्दा वैशंपायन, अर्शिन राऊत, अवंतिका चिले, अजिंक्य धोदरे, समीक्षा मोरे, यामिनी शिंदे, राहुल महाले, कुश चोपडा, कौशिक इत्यादी विद्यार्थी कोर टीम मेंबर म्हणून कार्यरत होते. सूत्रसंचालन मैथिली भगत हिने केले तसेच आभार मानव टेमकर याने मानले.

# चौक-वाशिवली रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्याची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

सद्या चौक-वाशिवली रस्त्यावर वाहतूक कोंडीचे ग्रहण लागले असून, आता हि बाब नित्याचीच झाली आहे. त्यामुळे सायंकाळी या रस्त्याचा प्रवास म्हणजे रात्र जागवावी असाच अनुभव येत आहे. चौक या शहरात वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे. ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांमधून होत आहे.


(छाया : अर्जुन कदम)

अद्यापही चौक बाजारपेठमधील वाहतूक कोंडी सोडविण्यावर कोणतीच ठोस कारवाई करताना अथवा प्रयत्न होताना संबंधित असलेल्या यंत्रनेकडून दिसत नाहीत, त्यामुळे येथील जनताही कंटाळून गेली आहे. रोज मरे त्याला कोण रडे असे म्हणत व्यापारी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, बाजारपेठेत येणारे गिऱ्हाईक बोलताना ऐकण्यास मिळत आहे. चौक बाजारपेठमधील वाहतूक कोंडी असतानाच तिलाच लागून चौक-वाशीवली रस्त्यावर वाहतूक कोंडी सुरू झाल्याने तिची साखळी चौक बाजारपेठमधील वाहतूक कोंडीला चिकटत आहे.

चौक बाजारपेठमधून वाशिवली, लोहोप, रसायनी, पौद, माडप या औद्योगिक वसाहत साठी जवळचा रस्ता आहे. त्यातच या चौक वाशीवली रस्त्यावरील सारंग, पाली, कोपरी, आसरोटी, तुपगाव, लोहोप, वाशीवली व त्यापुढील गावांतील अनेक नागरीक या रस्त्याचा वापर करून चौक या बाजारपेठेत बाजार रहाट करण्यासाठी येत असतात. त्यात कामगार, विद्यार्थी, नागरीक, कंपनीच्या कामगार वाहतूक करणाऱ्या बस गाड्या यांचाही समावेश असतो. चौक-वाशीवली रस्त्यावरील तुपगाव हद्दी पर्यंत दुतर्फा वाहन पार्किंग केली जाते. टेम्पो, थ्रीव्हीलर, कंपनीच्या बस, टू व्हीलर, रिक्षा हे बेजबाबदार पार्किंग करतात तर अनेकजण छोट्या मोठया कामासाठी याचं मार्गावर गाड्या उभ्या करून चौक बाजारपेठ येथे येतात, त्यातच सायंकाळ असल्याने प्रत्येकाला घरी जायची ओढ असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे.

चौक-वाशीवली रस्त्यावरील तुपगावपर्यंत नवीन इमारती बांधल्या जात आहेत. त्यांचे रस्त्याच्या कडेला पडलेले बांधकाम साहित्य हाही कळीचा मुद्दा आहे. त्यामुळे निदान सकाळ व संध्याकाळी येथे वाहतूक पोलीस यांची नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# पोलादपूरच्या सडवलीत शेकापला खिंडार

## आमदार गोगावलेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील सडवली ग्रामपंचायत निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरूवात होताच शिवसेनेचे विधीमंडळ प्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वावर आणि शिवसेनेवर विश्वास दर्शवित असंख्य शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी माजी सरपंचांसह शिवसेनेमध्ये जाहिर प्रवेश केला.



या वेळी माजी सरपंच गंगाराम दगडू जाधव यांनी शेकडो कार्यकर्त्यांसमवेत शिवसेनेमध्ये प्रवेश करतेवेळी आमदार गोगावले यांनी पोलादपूर तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या क्षेत्रामध्ये कोटयवधी रूपयांची कामे करीत विकास साधला असताना शिवसेनेच्या माध्यमातून या ग्रामपंचायतीमध्ये कोट्यवधी रुपयांची विकासकामे करण्यात आली आहेत आणि आजदेखील सुरू आहेत आणि उर्वरित कामांची पूर्तता होण्यासाठी तसेच शेतकरी कामगार पक्ष विकासकामे करण्यासाठी सक्षम राहिला नसल्याने आमदार गोगावले त्यांच्या विधानसभा मतदार संघामध्ये करीत असलेल्या विकासकामांकडे पाहूनच शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांनी घेतला असल्याचे या वेळी सांगितले. माजी सरपंच गंगाराम दगडू जाधव, शिवराम जाधव, अनिता जाधव, विनोद जाधव, माधुरी जाधव, कलावती जाधव, ज्ञानदेव जाधव, महादेव जाधव, अंकुश जाधव, नंदकिशोर जाधव, शर्मिला जाधव, सोनू जाधव, जयवंती जाधव, मुक्ताबाई जाधव, पांडुरंग जाधव, जयवंती पांडुरंग जाधव, प्रमोद जाधव, मनोहर जाधव, मनीषा जाधव, राजेंद्र जाधव, उमेश जाधव, कुंदा जाधव, अनिकेत जाधव, सुहास जाधव, रंजना जाधव, सुगंधा जाधव, शांताराम जाधव, सुरेखा जाधव, श्रीरंग जाधव, सहदेव जाधव, आशा जाधव, विठोबा जाधव, कल्पना जाधव, रुपेश जाधव, गणेश जाधव, मंदा जाधव, तेजस जाधव, तात्याबा जाधव, नंदू पवार, ताई पवार, शांताराम जाधव, श्रुती जाधव, अजित जाधव, दिनकर जाधव, बेबी जाधव, दर्शना जाधव, सुनील जाधव, वैशाली जाधव, गोविंद जाधव यांच्यासह शेकडो शेकाप कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

> **सडवली ग्रामपंचायतीमध्ये शिवसेनेचे पारडे विरोधकांसाठी नक्कीच जड झाले असून शिवसेना या ग्रामपंचायतीवर शिवसेनेचा भगवा नक्कीच फडकवेल.**
>
> **-आमदार भरत गोगावले**

या पक्षप्रवेश समारंभासाठी रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, सुनील मोरे, पोलादपूर शहरप्रमुख सुरेश पवार, नगरसेवक मनोज प्रजापती, दशरथ उतेकर, मधुकर जाधव तसेच पोलादपूर तालुक्यासह सडवलीतील शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# म्हसळा येथे स्वच्छता श्रमदान, वृक्षारोपण

**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून शनिवारी (दि. १४) म्हसळा येथे स्वच्छता श्रमदान आणि वृक्षारोपण हा कार्यक्रम जल्लोषात साजरा करण्यात आला तसेच कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ. वेदांती पाटील यांच्या माध्यमातून स्वछ्तेची शपथही देण्यात आली. संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष सौ. गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगड च्या माध्यमातून विविध कौशल्य उपक्रम राबिवले जात असतांना 'कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार' यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्ष पासून सक्रिय पणे सुरू आहे.

स्वच्छता श्रमदान आणि वृक्षारोपण या कार्यक्रमावेळी मुख्याध्यापिका रा. जी. प. शाळा म्हसळा सुमित्रा खेडेकर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील, प्रशिक्षिक विनयकुमार सोनावणे, रोहिणी सोनावणे, आशा सेविका धनश्री मुंडे व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत स्वच्छता श्रमदान आणि वृक्षारोपण उपक्रम उत्साहात झाला.



# इर्शाळवाडीतील दरडग्रस्तांना 'इमॅजिका'ची मनोरंजन भेट

**खालापूर : प्रतिनिधी**

इर्शाळवाडी दरडग्रस्त बांधवांसाठी इमॅजिका (मालपाणी) ग्रुपचे मालक मनीष मालपाणी आणि जय मालपाणी व इमॅजिका मॅनेजमेंट यांनी इर्शाळवाडी येथे दुःखद घटनेच्या सुरुवातीपासून ते त्यांचे जनजीवन पूर्वपदावर दुःखाच्या खाईतून आनंदाच्या अंगणात आणण्याच्या उद्धेशाने शुक्रवारी (दि. १३) इमॅजिका पार्कमध्ये इर्शाळवाडीतील सर्व ग्रामस्थांचे एकदिवशीय सहळीचे आयोजन करण्यात आले होते.

आलेल्या सर्व ग्रामस्थांचे इमॅजिकाकडून स्वागत करण्यात आले. लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्व ग्रामस्थांनी दिवसभर इमॅजिकामधील विविध राईड्सचा आनंद घेतला व त्यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसून आले.



# माणगावात मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगांव : प्रतिनिधी**

आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उम्मते मुस्लीमा कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने ईद-ए-मिलादुन नबी निमित्त बुधवारी (दि. १८) सकाळी १० ते २ यावेळेत शासकीय विश्रामगृह याठिकाणी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा फायदा गरीब, गरजू जनतेने अवश्य घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. शिबिरात मोतीबिंदू शास्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधारकार्ड व रेशनकार्डची झेरॉक्स प्रत घेऊन यावी. तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरु असल्यास तीदेखील घेऊन यावीत. रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय शिबिरात करण्यात आली आहे.

शिबिरात येणाऱ्या गरीब, गरजू रुग्णांनी आपली नावनोंदणी सरफराज अफवारे (९८५०६०८०३२), फहद करबेलकर (९१३०२११४१), गुलजार खान (८४४६३९९५७७), शादाब गैबी (८९७५९१६००६) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन कमिटीतर्फे करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत अनधिकृत बांधकामांवर हातोडा

## तुर्भे, बेलापूर विभागात पालिकेची तोडक कारवाई





**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका अतिक्रमण विभागाच्या वतीने महापालिका कार्यक्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यांवर नियंत्रण ठेवण्यात येत असून शुक्रवारी (दि. १३) तुर्भे विभागातील दोन बांधकांमावर आणि बेलापूर विभागात अनधिकृतरित्या विनापरवानगी बांधलेल्या अतिक्रमण शेड व बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांचा मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई करण्यात आली.

तुर्भे विभागात यामध्ये पिंपळपाडा, से. ०५, सानपाडा, येथे वनिता अशोक पाटील यांचेमार्फत घर क्र. ११९/२ चे विनापरवानगी साधारणत: ९.४० मी. ु ६.०० मी. क्षेत्रफळाचे तळमजला अधिक दोन मजल्याचे आर सी सी बांधकाम सुरु होते.

अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ १(अ) अन्वये देण्यात आलेली २४ तास मुदतीची कलम ५२ च्या पोट कलम १ च्या खंड अ व क अन्वये ठरत असलेल्या अनधिकृत विकासकामाची नोटीस बजावण्यात आलेली होती. परंतू या ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरुच होते. या अनधिकृत बांधकामावर तुर्भे विभाग कार्यालयामार्फत तोडक कारवाईच्या मोहीमेचे आयोजन करुन हे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

त्याचप्रमाणे विलास भोईर, दिलीप भोईर, मनोज भोईर, अनिल भोईर यांनी घर क्र. ३३७, से. ०५, सानपाडा, येथे विनापरवानगी साधारणत: १०.०० मी. ु ८.६० मी. या मोजमापाचे तळमजल्याच्या स्लॅबचे ठ.उ.उ. बांधकाम पूर्ण केले होते व पहिल्या मजल्याच्या कॉलमचे काम सुरु होते. याही अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ १(अ) अन्वये देण्यात आलेली २४ तास मुदतीची कलम ५२ च्या पोट कलम १ च्या खंड अ व क अन्वये ठरत असलेल्या अनधिकृत विकासकामाची नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापि या ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरुच ठेवण्यात आले होते. या अनधिकृत बांधकामावर तुर्भे विभाग कार्यालयामार्फत तोडक कारवाईच्या मोहीमेचे आयोजन करुन हे देखील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेले आहे.

बेलापूर विभाग कार्यालय क्षेत्रातील सेक्टर १५ बेलापूर येथील (१) महेश हॉटेल, (२) प्रणाम हॉटेल, (३) हॉटेल लक्ष्मी, (४) मालवणी कट्टा, (५) अश्विथ हॉटेल, (६) मॅकडॉनल्स, (७) कबाना बार, (८) द स्कॉड, (९) द चाप हाऊस, (१०) पॅनेशिया, (११) एस स्पाईस हे व्यावसायिक आपल्या सामासिक जागेचा (मार्जिनल स्पेस) शेड टाकून व्यवसायासाठी वापर करीत होते. तसेच सनसिटी इमारतीसमोर विनापरवानगी पावसाळी शेड उभारण्यात आले होते. तथापि याबाबत संबंधितानी नोटीशीची दखल न घेतल्यामुळे बेलापूर विभाग कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन अनधिकृत शेड / पावसाळी शेड निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. या निष्कासनादरम्यान झालेला कारवाईपोटी दंडात्मक रु. २५ लक्ष इतकी वसुली करण्यात आलेली आहे.

### पुढील काळात कारवाई अधिक तीव्र होणार

महापालिका आयुक्त यांच्या आदेशान्वये, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली, तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त / भरत धांडे यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई तुर्भे विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या सहयोगाने करण्यात आली. या मोहिमेसाठी अतिक्रमण निर्मुलन पथकातील पोलीस अधिकारी, अंमलदार देखील तैनात ठेवण्यात आले होते. या पुढील काळात सर्वच विभागांमध्ये अतिक्रमण विरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.



# नियम पाळून नवरात्रोत्सव करा

## पनवेल पोलिसांचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

सर्व शासकीय नियमांचे पालन करून व संबंधित विभागाकडील परवानग्या घेऊन नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करावा असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी नवरात्रोत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांच्या आयोजित बैठकीत केले.

या बैठकीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, गुन्हे पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, प्रशाकीय पोलीस निरीक्षक प्रवीण भगत, गोपनीय विभागाचे अधिकारी संजय धारेराव यांसह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीमध्ये नवरात्र उत्सव पदाधिकाऱ्यांना मंडपाचे जागेबाबत महानगरपालिका, वाहतूक शाखा व इतर संबंधित विभागाकडील परवानग्या घेणे, मूर्ती स्थापना, आगमन व विसर्जन मिरवणुकी संदर्भातील सूचना देऊन उत्सवा दरम्यान कोणीही डीजे डॉल्बीचा वापर करू नये, आक्षपार्ह बॅनर्स, देखावे न करणे, दुर्गा मूर्तीचे मंडपामध्ये दिवसा व रात्री स्वयंसेवक नेमणे, महिलांची छेडछाड होणार नाही यासाठी तसेच गरबा खेळत असताना स्वयंसेवक नेमणे, गरब्याचे ठिकाणी तसेच मूर्तीचे आजूबाजूला मंडप परिसरामध्ये सीसीटीव्ही लावणे तसेच अग्निशमन यंत्र लावणे, आगमन विसर्जन मिरवणुकीत तसेच गरबा दांडिया दरम्यान लेझर लाईट्स वापरू नये, पूर्व परवानगी शिवाय ड्रोन वापरू नये या बाबतच्या सूचनादेण्यात आल्या.

# सारडे येथे मोफत आधार कार्ड अपडेट शिबिर



**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

डिपार्टमेंट ऑफ पोस्ट-नवी मुंबई डिविजन व ग्रामपंचायत सारडे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आधार कार्ड अपडेशन कॅम्पचे आयोजन शुक्रवारी (दि. १३) करण्यात आले होते. सारडे गावातील तसेच आजूबाजूच्या गावातील लोकांनी या कॅम्पमध्ये येऊन आपले आधार कार्ड अपडेट करून घेतले.

या वेळी कॅम्पसाठी अमोल राऊत उप अधिक्षक वाशी सब डिवीज़न, डिपार्टमेंट ऑफ पोस्टचे अधिकारी सुनिल केशव पाटील, मनीष गोविंद नागावकर पोस्टल असिस्टंट, सारडे ग्रामपंचायतीचे सरपंच रोशन पांडुरंग पाटील, उपसरपंच जीवन श्रीराम पाटील, सदस्य अमित नथुराम म्हात्रे, महेश भरत पाटील, अमीता सूनित पाटील, अस्मिता हिरामण म्हात्रे, प्रतिक्षा अजिंक्य पाटील, कामिनी गणेश पाटील, ग्रामसेविका संचिता केणी, शाळा मुख्याध्यापिका उर्मिला म्हात्रे व शाळेतील उपशिक्षक तसेच ग्रामपंचायत कर्मचारी महेश मनिराम पाटील व सत्यवान बाळकृष्ण पाटील यांचे विशेष सहकार्य मिळाले.

ग्रामीण भागात आधार कॅम्पचे आयोजन केल्याने ग्रामस्थांनी, जनतेनी सारडे ग्रामपंचायतचे सरपंच रोशन पाटील व ग्रामपंचायत सदस्यांचे तसेच पोस्ट ऑफिस अधिकारी कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# न्यू इंग्लिश स्कूलमध्ये साहित्यवाटप

## हॅप्पी स्कूल प्रोजेक्ट अंतर्गत उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल मार्केट यार्डमधील न्यू इंग्लिश स्कूलला इनरव्हील क्लब ऑफ गॅलेक्सी ऑफ न्यू पनवेलतर्फे हॅप्पी स्कूल प्रोजेक्ट २०२३ अंतर्गत क्लब प्रेसिडेंट डॉ. शीतल फरांदे (कांडपिळे) आणि सुनिता कांडपिळे व त्यांच्या सर्व क्लब मेंबर्सकडून विद्यालयास १००० लिटर पाण्याची टाकी,५० स्कूल युनिफॉर्मर्स, १५० शूज, १५० सॉक्स, ५० बॅग्स,१५० नोटबुक्स, ढोल, ताशा, लेझीम, डंबेल्स, दोरी उड्या या सर्व अमूल्य वस्तू देणगी स्वरुपात वाटप करण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून अर्चना ठाकूर, ममता म्हात्रे आणि रायगड विभागाचे विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाडकर मॅडम यांनी केले.सर्व क्लब मेम्बर्स यांचे स्वागत विद्यालयाकडून संस्था उपरणे आणि गुलाब पुष्प देवून करण्यात आले. देणगी स्वरुपात दिलेल्या साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. चिखलेकर यांनी सर्व मेम्बर्सचे आभार मानले. आर. पी. ठाकूर यांनी विद्यालयाची सद्यस्थिती आणि या परिस्थितीत दिलेली मदत याबद्दल आपल्या मनोगतातून आभार व्यक्त केले.

विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या वेळेस ढोल ताशा च्या गजरात लेझीम नृत्य सादर केले. मनिषा पाटील यांनीया क्लब मेम्बर्सचे व सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# घटस्थापनेसाठी उरणमध्ये नारळाच्या शहाळ्यांचे मुखवटे

## ५०हून अधिक वर्षांची परंपरा कायम



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोठे नागाव येथे राहणारे सामाजिक कार्यकर्ते दिलीप यशवंत पाटील यांनी नारळाच्या शहाळ्यापासून देवीचे सुंदर मुखवटे बनवितात.

गेली ४० वर्षांपासून ते देवीचे मुखवटे बनवीत आहेत. त्या मुखवटा साठी खूप मागणी असते. दिलीप पाटील यांचे वय ६६ वर्षे असून या कामासाठी सून, मुलगा, नातू मदत करीत आहेत. मुखवट्याला अलिबाग, ठाणे, कल्याण, बदलापूर, उरण, करंजा, बोकडविरा आदी ठिकाणाहून मागणी असते.

यंदा मी ८८ मुखवटे बनविले असून एका मुखवट्यांला २५० रुपये मी घेत असतो. ओल्या नारळाच्या शहाला काढून तो वरील बाजूस सोलून त्यावर सुंदर चेहऱ्याची आखणी केली जाते. सजवली जाते, असे दिलीप पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, नागावमधीलच गजानन नाईक हे वयाच्या ८० व्या वर्षी आपल्या कलेच्या साधनेतून हे मुखवटे मागील ६० वर्षांपासून तयार करीत आहेत. मुखवट्याचे काम हे व्यवसाय म्हणून नव्हे तर कलेची जपवणूक करण्यासाठी करीत असल्याची माहिती कलाकार गजानन नाईक यांनी दिली.

# बेलापूरच्या किल्ले गावठाण येथे नवरात्रोत्सव



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील सुमारे ३०० वर्षापूर्वीचे पुरातन पेशवेकालीन एकमेव मंदिर म्हणून आई गोवर्धनी माता मंदिराची आख्यायिका आहे. आई गोवर्धनी मातेची प्राणप्रतिष्ठापना पेशवेकाळात झाली असून नवी मुंबईतीलच नव्हे तर संपूर्ण पंचक्रोशातील ठाणे, रायगड, पालघर, जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांना नवसाला पावणारी आई गोवर्धनी माता प्रसिद्ध आहे. तसेच नवी मुंबईच्या नावलौकीकाला साजेशा व चिमाजी अप्पांपासून ३०० हून अधिक वर्षाच्या इतिहासाला उजाळा देणाऱ्या आई गोवर्धनी माता मंदिर आहे.

नवी मुंबईतील सोनार, ब्राम्हण, आगरी-कोळ्यांची कुलदेवता असलेली आणि भक्तांच्या हाकेला धावणारी अशी आई गोवर्धनी मातेची जनमाणसात ख्याती आहे. आई गोवर्धनी माता मंदिर हे निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केलेल्या निसर्गरम्य टेकडीवर वसलेले असून हिरवळीने नटलेले आहे. मंदिराच्या पाठीमागे विस्तीर्ण असा समुद्र लाभलेला आहे. या पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार १५ वर्षापूर्वी उद्योजक . विजय नारायण म्हात्रे व आमदार मंदाताई म्हात्रे.यांच्या शुभहस्ते करण्यात आला होता. रविवारी (दि. १५) आई गोवर्धनी माता मंदिरात मोठ्या उत्साहात नवरात्रोत्सव घटस्थापना होणार आहे.

आई गोवर्धनी माता मंदिरात रविवारी सकाळी ७ उद्योगपती योगेश विजय म्हात्रे व नमिता योगेश म्हात्रे यांच्या हस्ते आई गोवर्धनी मातेचा अभिषेक व पूजा होणार आहे. आई गोवर्धनी मातेच्या सर्व भाविक भक्तांनी सकाळी ७ वाजता अभिषेक-पूजा व आरतीला उपस्थित राहण्याचे आवाहन आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केले आहे तसेच रोज सकाळी ७ वाजता आईची पूजा-आर्चा होणार असून ज्या भाविक भक्तांना देवीचा अभिषेक करावयाचा आहे त्यांनी नाव नोंदणीकरिता सुधीर शेट्टी (७७३८७२९२५८) तसेच हेमंत कोळी (९१६७३०२८२७) या क्रमांकाशी संपर्क साधावयाचा आहे.

शुक्रवार (दि. २०) सांय ४ वाजता संकल्प महिला मंडळ नवी मुंबई यांच्या वतीने भोंडला व पारंपारिक देवीची गाणी तसेच सांय ५ वाजता हळदी कुंकू चा कार्यक्रम होणार आहे. सोमवारी (दि. २३) सकाळी १० ते दु. १ वाजता आईचा नवचंडी होम व दुपारी १ नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडणार आहे. या नवरात्रोत्सवा शुभदिनी सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आग्रहाचे आमंत्रण आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केले आहे.

# फुंडे हायस्कूलमध्ये नेत्रचिकित्सा, आरोग्य तपासणी शिबिर




**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी, उरण आणि अपोलो हॉस्पिटल, नवी मुंबई यांच्या सौजन्याने नेत्रचिकित्सा व आरोग्य तपासणी शिबिर गुरुवारी (दि. १२) झाले.

लायन्स क्लब ही एक अत्यंत नावाजलेली संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात असतात. त्यांच्या सहकार्याने आज फुंडे हायस्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी नेत्रचिकित्सा शिबिर आणि शिक्षक व पालक वर्गासाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. याकरिता अपोलो हॉस्पिटल नवी मुंबई येथील डॉक्टरची टीम उपस्थित होती. उपस्थित सर्वांचे विद्यालयाच्या वतीने गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

लायन्स क्लब द्रोणागिरीचे अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्या सीमा घरत, एमसीएफ लायन रमाकांत म्हात्रे, रिलीव्ह द हंगरचे जिल्हा समन्वयक लायन मिलिंद पाटील, विभाग समन्वयक लायन संदीप म्हात्रे, लायन्स क्लब द्रोणागिरीचे उपाध्यक्ष सागर चौकर, सचिव मोनिका चौकर, खजिनदार भूमिका सिंग, झोनल समन्वयक मेंबर श्रेयश म्हात्रे आणि आदित्य घरत यांच्या समवेत अपोलो हॉस्पिटल मधून डॉ. अमर, सविता पानसरे,विरेन पानसरे आणि समवेत वैद्यकीय टीम उपस्थित होती.

विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभाग प्रमुख साधना पाटील यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले होते. या वेळी इयत्ता पाचवी ते दहावी अखेरच्या सर्व विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. ज्या विद्यार्थ्यांना दृष्टीदोष आहे अशा विद्यार्थ्यांना अल्प दरात चष्मे वाटप करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक यांचीही आरोग्य तपासणी करण्यात आली.

यामध्ये ब्लड प्रेशर, मधुमेह, बोन्स डेन्सिटी, नेत्र तपासणी आणि ईसीजी या सर्व तपासण्या करण्यात आल्या. विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे चेअरमन कृष्णाजी कडू, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, कार्यालय प्रमुख एम. पी. तुमडे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के. कुटे, शालेय आरोग्य विभाग प्रमुख साधना पाटील मॅडम, एच. एन. पाटील आणि सर्व शिक्षक वृंद व पालक उपस्थित होते.

# चमत्कारामागील विज्ञान विषयावर व्याख्यान



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या घणसोली शाखेने, 'चमत्कारामागील विज्ञान' विषयावर व्याख्यान झाले. व्याख्यान माथाडी हॉस्पिटल ट्रस्टच्या वतीने, स्व. शिवाजीराव अण्णासाहेब पाटील यांच्या २४व्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित करण्यात आले होते. व्याख्यान शुक्रवारी (दि. १३) कोपरखैरणे येथील माथाडी हॉस्पिटल ट्रस्टमधे पार पडले.

चमत्कार तिथे नमस्कार ही समाजाची मानसिकता आहे. ही मानसिकता विचार करण्याचा आळस यामुळे तयार होते. विचार करणे थांबतात ते, चमत्कारांची अपेक्षा करतात. प्रत्येक घटनेमागे कारण असते, त्या कारणांमुळे ती घटना घडलेली असते. हा सामान्य विचार नाकारुन आपोआप चमत्काराने घटना घडतात हा चुकिचा विचार आंधळेपणाने स्विकारणे वाईट आहे. त्यामुळे आपण आपल्या जीवनाची सूत्रे चमत्काराचा दावा करणार्या भोंदू बाबा-बुवांच्या हातात देतो.

चमत्काराचा दावा करणारे आपले शारीरिक, आर्थिक, मानसिक व सामाजिक शोषण करतात. आपण विज्ञानातून आपल्या राहणीमानात पुरेपूर आधुनिकता आणली आहे. तीच आधुनिकता आपल्या विचारात सुध्दा आणली पाहिजे. जे तर्कसंगत नाही ते विचार नाकारुन अंधश्रद्धेला मूठमाती दिली पाहिजे, असा संदेश व्याख्यानात देण्यात आला. व्याख्यानात काही चमत्कारांचे सादरीकरण करून त्यामागील विज्ञान, तंत्र व हातचलाखी उलगडून दाखवण्यात आली.

व्याख्यानात उपस्थित मान्यवर डॉ. हणमंतराव अण्णासाहेब पाटील, डॉ. राजश्री हणमंतराव पाटील, जी. एस. पाटील, मोहन जाधव, अर्जुन जाधव व विजय पाटील. महा. अंनिसच्या उत्तम रोकडे, गजानंद जाधव व अशोक निकम यांनी व्याख्यानात मार्गदर्शन केले.

# नागोठण्यात भटक्या कुत्र्यांची दहशत

## उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी

**नागोठणे : प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून नागोठणे शहरात भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली असून ते १८ ते २० जणांच्या टोळीने विविध ठिकाणी रपेट मारत मुक्तसंचार करीत हैदोस घातला आहे. त्यांच्या दहशतीने लहान मुले, वयोवृद्ध नागरिक तसेच विद्यार्थ्यांसह पालकही भयभीत झाल्याचे चित्र दिसत आहे. याबाबत संबंधित खाते मात्र सुस्त अवस्थेत आहे. या कुत्र्यांपासून कुणावर जीवघेणा हल्ला होण्याअगोदर संबधित खात्यांकडून कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.


(छाया : राज वैशंपायन)

नागोठणे शहरात काही दिवसांपासून भटक्या कुत्र्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून बहुतेक कुत्र्यांना संसर्गजन्य रोग झाला आहे. हे कुत्रे एसटी बसस्थानक, शिवाजी चौक, कोळीवाडा, मच्छी व मटण मार्केट, खान मोहल्ला, उर्दू हायस्कूल, ग्रामपंचायत, पोस्ट कार्यालय, गांधी चौक, जोगेश्वरी मंदिर परिसरासह चौका-चौकात व शाळेत जाणाऱ्या रस्त्यांवर १८ ते २० जणांच्या वेगवेगळ्या टोळक्याने रपेट मारताना दिसतात.

या कुत्र्यांना संसर्गजन्य रोग झाल्याने त्याच्या वासाने नागरिक बेजार झाले असून रस्त्याने येणारे विद्यार्थी, वाटसरू, चारचाकी वाहने तसेच मोटरसायकलस्वाराच्या अंगावर भुंकत धावून जात आहेत. त्या वेळी घाबरलेल्या वाहनचालकांकडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच शाळेत जाणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी या टोळक्यांच्या मधून भीत भीत वाट काढत जात असतात. तसे करीत असताना या कुत्र्यांनी हल्ला केला, तर तो हल्ला जीवघेणा होऊ शकतो.

भटके कुत्रे विशेषत: रात्रीच्या वेळी तर भुंकून हैराण करतात. या कुत्र्यांपासून वयोवृद्धांसह नागरिक भयभीत होत आहेत. त्याचप्रमाणे उर्दू हायस्कूल, मुल्ला चाळ परिसरातील कुत्रे लहान विद्यार्थ्यांना लक्ष्य करीत असून नागरिकांच्याही अंगावर धावून जात असतात. रात्री व पहाटेच्या वेळी बहुतेक नागरिक छत्रपती शिवाजी चौकातून वरवठणे व वेलशेत बाजूकडे तसेच जोगेश्वरी मंदिर परिसरात फिरायला येत असतात. ते कुत्र्यांच्या भीतीने जीव मुठीत घेऊन फिरत असल्याचे चित्र बहुतांशी दिसत असते. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी चौकातून सकाळी लवकर शाळा कॉलेजला जाणारी बरीच लहान व मोठी मुले बसची वाट बघत असतात.

सर्वत्र दिसणाऱ्या भटक्या कुत्र्यांपासून एखादा मोठा अनर्थ होण्याअगोदरच त्यांचा संबधित खात्याकडून बदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**याबाबत तालुका पशू वैद्यकीय अधिकारी यांच्याबरोबर मीटिंग घेऊन लवकरात लवकर भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यात येईल. या कुत्र्यांपासून नागरिकांनी सावध राहावे तसेच कुत्रा चावल्यास तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा खासगी दवाखान्यात जाऊन औषधोपचार करून घेणे.**
**-राकेश टेमघरे, ग्रामसेवक, नागोठणे ग्रामपंचायत**

# धाटाव येथे एका वर्षात कुणबी समाज भवन उभारणार

- खासदार सुनील तटकरे यांची घोषणा
- महादेव मंदिरासाठी चार कोटींचा आराखडा


(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी आपण सर्व जन काम करीत आहोत. या ना त्या कारणाने आपणासी जोडता आले. दीर्घ काळ सगळ्यांचे कुणबी भवन तालुक्याच्या ठिकाणी असणे स्वप्न होते. आज दिमाखदार कुणबी भवन उभे होत आहे. आदिती तटकरेकडे राज्य उद्योगमंत्री असताना कुणबी समाज धाटाव विभागासाठी जागा उपलब्ध करण्यात आले. आज या कामाचे भूमिपूजन होत असताना हे कुणबी सभागृह वर्षभरात उभारणार आहोत, असे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले. त्याचप्रमाणे तीर्थक्षेत्र म्हणून महादेव मंदिरासाठी चार कोटींचा आराखडा तयार करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

कुणबी समाज धाटाव ग्रुप सामाजिक सभागृहकरिता धाटाव एमआयडीसी हद्दीतील १० गुंठे जागा लोकार्पण व कुणबी समाज सभागृहकरिता खासदार निधी २५ लाख रुपये देण्यात आले. त्याच्या भूमिपूजन समारंभात खासदार तटकरे आरआयसी सभागृहात बोलत होते. या समारंभास आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, ओबीसी जनमोर्चा जिल्हाध्यक्ष सुरेश मगर, शंकर भगत, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, अनिल भगत, रामचंद्र सकपाळ, दिपिका चिपळूणकर, गुणाजी पोटफोडे, दिनेश रटाटे, केशव भोकटे, ज्ञानेश्वर साळुंखे, मधुकर बामुगडे, जयवंत मुंढे, नामदेव म्हसकर, विनोद बाईत, महेश बामुगडे, अरविंद मगर, मुकेश भोकटे, किशोर रटाटे, दत्ता चव्हाण, हरिश्चंद्र माने, अमित मोहिते, प्रदीप बामुगडे, परशुराम भगत, सतिश भगत, ज्ञानेश्वर दळवी, रुपेश बामुगडे, चंद्रकांत भगत रवी दिघे आदी उपस्थित होते.

लेक लाडकी अभियान हा क्रांतिकारी निर्णय राज्य सरकारने घेतले आहे. महिला अर्थिक विकास मंडळ व उमेदच्या माध्यमातून महिला बचत गटांसाठी या दोन्ही संस्थेशी संलग्न करुन त्यांना रोजगार मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे खासदार तटकरेंनी सांगितले.

या वेळी आमदार अनिकेत तटकरे यांनी, धाटाव कुणबी समाजाच्या सभागृहाचे स्वप्न खासदार सुनील तटकरे यांच्यामुळे साकार होताना दिसत आहे. तालुक्याचा विकास झाला आहे, असे सांगितले. धाटाव कुणबी समाजासाठी सभागृह आवश्यक होते. खासदार सुनील तटकरे यांनी जागेसह २५ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात दिनेश रटाटे यांनी रोहा एमआयडीसी हद्दीत १० गुंठे जागा व २५ लाखांचा निधी खासदार सुनील तटकरे यांनी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे समाजाच्या वतीने आभार मानले. या वेळी समाजाचे नेते, समाजबांधव, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांअभावी कडसुरे शाळेला संतप्त पालकांनी ठोकले कुलूप

**नागोठणे : प्रतिनिधी**

निवेदनाद्वारे वारंवार मागणी करूनही कार्यवाही होत नसल्याने अखेर संतप्त पालकांनी चक्क कुलूप ठोकून शाळा बंद केल्याचा प्रकार जिल्हा परिषद शाळा कडसुरे येथे घडला आहे. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक मिळत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

रोहा तालुक्यातील कडसुरे येथील जिल्हा परिषद शाळेत पहिली ते पाचवीपर्यंत वर्ग असून विद्यार्थी संख्या २५



इतकी आहे व तिथे सेमी इंग्लिश शिकवले जाते, मात्र विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी केवळ एकच शिक्षकाची नेमणूक करण्यात आली असून त्यात शासनाची येणारी शिक्षणाव्यतिरिक्त अन्य कामे करावी लागतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर मोठा परिणाम होत आहे. पर्यायी अन्य एका शिक्षकाची कायमस्वरूपी नेमणूक करावी; अन्यथा आम्ही सर्व पालक विद्यार्थ्यांना घेऊन पंचायत समिती कार्यालय शिक्षण विभाग रोहा येथे येऊन बसू व त्यानंतर होणाऱ्या परिणामाला फक्त हा विभाग जबाबदार असेल असा इशारा या वेळी पालकांनी दिला.

याबाबत गटशिक्षण अधिकारी मेघना धायगुडे यांच्याशी संपर्क साधला असता १६ ऑक्टाबरपर्यंत कायमस्वरूपी शिक्षकाची नेमणूक केली जाईल, असे सांगण्यात आले.

# नागोठणे येथील तरुणाची आत्महत्या



**नागोठणे** : सुधागड तालुक्यातील राबगाव येथील रहिवासी आणि नोकरीनिमित्त नागोठणे येथे राहणारा अरुण गणेश भोईर या २८ वर्षीय अविवाहित तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि. १३) घडली. मनमिळावू, प्रेमळ स्वभाव तसेच मितभाषी असलेला अरुण भोईर हा तरुण गेली १० ते ११ वर्षे माजी जि.प. सदस्य किशोर जैन यांच्या वाहनावर चालक म्हणून काम करीत होता. त्याने शुक्रवारी सकाळी ११.३०च्या सुमारास घराच्या बेडरूममध्ये पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. याबाबत नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदीप पोमण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# रातवड विद्यालयात वाचन प्रेरणा दिन, चित्रकला स्पर्धा


(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन व चित्रकला स्पर्धा मोठ्या उत्साहात झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव जाधव, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, छात्र संसद यांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेच पूजन व अभिवादन करण्यात आले.

विद्यालयातील विद्यार्थी हर्षद नाडकर व मंजिरी सुर्वे यांनी आवडलेल्या पुस्तकांचे परीक्षण केले. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी विद्यालयाने पूर्व नियोजन करून विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन विविध विषयांवरील आवडीची पुस्तके निवडली व त्यांना ती पुस्तके देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी आवडीप्रमाणे पुस्तक घेऊन एक तास निखळ वाचनाचा आनंद घेतला. विद्यालयाचे शिक्षक अजित शेडगे यांनी डॉ. ए.पी.जे. कलाम यांच्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. या निमित्ताने विद्यालयात ऊर्जा क्लब अंतर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आकर्षक रंग देत चित्रांचे रेखाटन केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी हा या उपक्रमाचा हेतू होता.

या निमित्ताने मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. विविध प्रकारच्या पुस्तकांशी विद्यार्थ्यांचा परिचय झाला. एकत्रित वाचनाचा आनंद विद्यार्थ्यांना मिळाला. शिक्षक अमोल तोडकर, भारती कांबळे, व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या संकल्पनेतून कार्यक्रम झाला.

# सुरक्षित मातृत्वासाठी मातृ वंदना योजना २.०

**दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील अनेक गर्भवती महिलांना गर्भारपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत शारीरिक क्षमता नसतानाही मजुरीसाठी काम करावे लागते. यामुळे देशातील गर्भवती माता व बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन माता व बाल मृत्यू दरात वाढ झाल्याने ते नियंत्रित करण्यासाठी १ जानेवारी २०१७पासून प्रधानमंत्री मातृ वंदना योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी राज्यात ८ डिसेंबर २०१७पासून आरोग्य विभागामार्फत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य, जिल्हास्तरावरून सुरू होती. शासनाने अधिसूचित केलेल्या संस्थेत नोंदणी केलेल्या (शासकीय रुग्णालयात) गर्भवती महिलेस पहिल्या जीवित अपत्यापुरता एकदाच लाभ अनुज्ञेय असून तीन टप्प्यात लाभाची रक्कम पाच हजार रुपये डीबीटीद्वारे लाभार्थीच्या बँक, पोस्ट खात्यात दिली जात होती.**

केंद्र शासनाच्या महिला बाल विकास विभागाच्या सूचना मिशन शक्ती च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सुधारित प्रधानमंत्री मातृ वंदना योजना २.० राज्यात लागू करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालय सूचनांनुसार मिशन शक्ती अंतर्गत दोन भागात एकूण १४ योजना एकत्रित केल्या आहेत. त्यापैकी सामर्थ्य या विभागात एकूण सहा योजना असून या योजनांमध्ये प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेतंर्गत लाभार्थीना लाभ देणे व योजना राबविण्याबाबतच्या सुधारित मार्गदर्शक सूचना सन २०२३-२४पासून राज्यात लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच ही योजना केंद्र व राज्याच्या सहभागाने राबविण्यात येणार असून या योजनेत लाभार्थ्यांकरिता केंद्र शासनाचा ६० टक्के, तर राज्य शासनाचा ४० टक्के सहभाग राहणार आहे. योजनेचा संपूर्ण प्रशासकीय खर्च शासनाच्या स्व-निधीतून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.




प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतंर्गत पात्र लाभार्थी महिलेने विहीत अटी, शर्ती आणि कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर तिला पहिल्या अपत्यासाठी पाच हजार रुपयांची रक्कम दोन हप्त्यांमध्ये, तर दुसरे अपत्य मुलगी झाल्यास मुलीच्या जन्मानंतर एकाच टप्प्यात सहा हजार रुपयांचा लाभ आधार संलग्न बँक खात्यात किंवा टपाल विभागातील खात्यात डीबीटीद्वारे जमा केला जाईल.

योजनेची उद्दिष्टे : माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा मातांना सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी. जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचे आरोग्य सुधारावे आणि माता मृत्यू व बाल मृत्यू दरात घट होऊन तो नियंत्रणात रहावा. लाभ हा जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर सुधारणे, स्त्री-भ्रूणहत्येस अवरोध करणे आणि स्त्री जन्माचे स्वागत होण्यासाठी हितकारी ठरणार आहे. लाभार्थ्यांकडून आरोग्य संस्थांच्या सुविधांचा लाभ घेण्याचे प्रमाण वाढून संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण वृद्धिंगत करणे. नवजात अर्भकाच्या जन्माबरोबरच जन्म नोंदणीचे प्रमाणात वाढ व्हावी.

लाभार्थी खालीलपैकी किमान एका गटातील असावा : ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबीक उत्पन्न प्रतिवर्ष आठ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिला, ४० टक्के व अधिक अपंगत्व असणाऱ्या (दिव्यांग जन) महिला, बीपीएल शिधापत्रिकाधारक महिला, आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (झचग-ध) अंतर्गत महिला लाभार्थी, ई-श्रम कार्डधारक महिला, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी, मनरेगा जॉब कार्डधारक महिला, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्ती. ही कागदपत्रे आवश्यक : लाभार्थी आधार कार्ड प्रत किंवा आधार नोंदणी (एखऊ) कागदपत्र, शेवटच्या मासिक पाळीची तारीख, गरोदर पणाची नोंदणी तारीख व प्रसुतीपूर्व तपासणीच्या नोंदी असलेले परिपूर्ण भरलेले माता आणि बाल संरक्षण कार्ड, प्रसुतीपूर्व तपासणीच्या नोंदी असाव्यात. लाभार्थीच्या स्वतःच्या बँक पासबुकची प्रत, बाळाचे जन्म नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, माता आणि बाल संरक्षण कार्डवर बाळाच्या लसीकरणाच्या नोंदी असलेल्या पानाची प्रत, गरोदरपणाची नोंदणी केलेला आरसीएच पोर्टलमधील लाभार्थी नोंदणी क्रमांक, लाभार्थीचा स्वतःचा किंवा कुटुंबातील सदस्यांचा मोबाईल क्रमांक, वेळोवेळी विहित केलेले अन्य कागदपत्र.

योजनेची वैशिष्टचे आणि अंमलबजावणी : सर्व नवीन लाभार्थी ज्यांची मासिक पाळीची शेवटची तारीख मिशन शक्ती मार्गदर्शक तत्वे प्रकाशित झाल्याच्या तारखेनंतर आहे, त्यांना PMMVY २.०च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार लाभ मिळेल. जर एखाद्या महिलेने आधीच PMMVY १.० अंतर्गत मातृत्व लाभाचा पहिला हप्ता प्राप्त केला असेल व PMMVY २.० अंतर्गत मंजूर केलेल्या निकषांनुसार रोख प्रोत्साहन मिळविण्यासाठी पात्र असेल. जर तिला PMMVY १.० अंतर्गत पहिला आणि दुसरा हप्ता मिळाला असेल, तर तिला नवीन PMMVY २.० मार्गदर्शक तत्त्वांनुसार उर्वरित लाभ मिळू शकतात.

लाभ देण्याची कालमर्यादा : पहिल्या अपत्यासाठी शेवटच्या मासिक पाळीच्या (ङचझ) दिनांकापासून पूर्वी असणारा ७३० दिवसांचा कालावधी कमी करुन तो ५१० दिवसांवर आणलेला आहे, तर दुसरे अपत्य मुलगी असल्यासच तिच्या जन्माच्या तारखेपासून २१० दिवसांपर्यंत संबंधित आरोग्य यंत्रणेकडे द्यावा. लाभार्थ्यांनी विहित कालावधीत लाभ घेण्यासाठी अर्ज करणे आवश्यक असून कालावधी उलटून गेल्यानंतर लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत लाभ मिळणार नाही तसेच लाभार्थ्यांनी हस्तलिखित फॉर्म जमा केलेला असेल, परंतु प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या नवीन संगणक प्रणालीद्वारे कोणत्याही कारणामुळे ऑनलाईन पद्धतीने फॉर्म स्वीकारले जात नसल्यास अशा लाभार्थ्यांना लाभ देय नसेल. योजनेचा लाभ घेण्याकरिता लाभार्थीचे वय किमान १८ वर्षे व कमाल ५५ या दरम्यान असावे. लाभार्थीने विहित कालावधीत शासकीय आरोग्य संस्थेत गर्भधारणेची नोंदणी करणे आवश्यक आहे.

असा करावा अर्ज : इच्छुक असलेल्या लाभार्थीना महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या http://wcd.nic.in संकेतस्थळावरून अर्ज डाऊनलोड करणे आणि सिटिझन लॉग इनमधून ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. लाभार्थीने अर्ज परिपूर्ण भरुन आपल्या स्वाक्षरीच्या हमीपत्रासह सर्व आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या आरोग्य केंद्रात किंवा आशा स्वयंसेविका यांच्याकडे जमा करावा. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतंर्गत लाभ पात्र लाभार्थी महिलेस तिच्या स्वतःच्या आधार संलग्न (सीडेड) बँक किंवा पोस्ट ऑफिसमधील खात्यातच डीबीटीद्वारे जमा केला जाईल. लाभार्थ्यांना केवळ आधार क्रमांकाच्या आधारावरच लाभ दिला जाईल. वेतनासह मातृत्व रजा मिळणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. (केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये नियमित सेवेत असलेल्या सर्व गर्भवती महिला आणि स्तनदा माता किंवा सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्यांतर्गत समान लाभ मिळवणाऱ्या महिलांना PM-MVY अंतर्गत लाभ देय नाही.)

योजनेविषयी महिला सभांचे आयोजन : ग्रामसभेच्या विषय सूचीमध्ये प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा समावेश करुन त्या अंतर्गत लाभार्थी व त्यांना मिळणारे लाभ या विषयी चर्चा करण्यात यावी तसेच लाभ मिळालेले लाभार्थी यांची माहिती ग्रामसभेत आशा कार्यकर्ती यांनी द्यावी. जेव्हा शक्य असेल त्या वेळी महिला सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य यांनी शक्य असेल तेव्हा विशेष महिला सभांचे आयोजन करावे.

या बैठकांमध्ये बचत गटांचे सदस्य, बँक, पोस्ट आणि जिल्हा प्रधानमंत्री मातृ वंदना कक्षास निमंत्रित केले जावे तसेच महिला बैठकांचे आयोजन वर्षातून किमान दोन वेळा करावे.

**-नीलेश तायडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

### अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राचे संघ जाहीर

## सायली जाधव, विक्रम कदम यांच्याकडे नेतृत्व

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या मान्यतेने व अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी संघटनेच्या वतीने १६ ते २० ऑक्टोंबर या कालावधीत कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नवी दिल्ली येथील त्यागराज क्रीडा संकुल येथे ही स्पर्धा खेळविण्यात येईल. या स्पर्धेकरिता महाराष्ट्र राज्याचे दोन्ही संघ जाहीर करण्यात आले आहेत.

यंदाच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त केलेल्या सायली जाधवकडे महिलांच्या, तर सांगलीच्या विक्रम कदमकडे पुरुषांच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली आहे. निवडण्यात आलेले हे दोन्ही संघ चार दिवसाच्या सरावानंतर शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून राजधानी एक्स्प्रेसने स्पर्धेकरिता रवाना झाले. निवडण्यात आलेले हे दोन्ही संघ सचिवालय जिमखान्याच्या कबड्डी विभागाचे सचिव मारुती कवलदार यांनी एका पत्रकाद्वारे सर्व प्रसारमाध्यमांना पाठविले आहे.





**संघ पुढीलप्रमाणे**

महिला संघ : सायली जाधव (संघनायिका), वैशाली खरमाळे, कल्पिता शिंदे, ज्योती राक्षे, नुपूर पवार, स्वाती काकडे, जयश्री साठे, रुजिना शेख, प्रिती झगडे, माधवी राऊत, मनीषा जगताप, उज्वला वाघमारे. प्रशिक्षक : संतोष जाधव, व्यवस्थापक : गणेश भोईर.

पुरुष संघ : विक्रम कदम (संघनायक), महेश सावकारे, संदीप इंदुलकर, सूरज कांबळे, गणेश वावरे, अंकुश महाले, मारुती पवार, राहुल चव्हाण, निवृत्ती जगताप, सुरेंद्रसिंह मेहरा, दिनेश नाडे, गोरख पवार, गणेश काळे, प्रशिक्षक : आनंद हेगडे, व्यवस्थापक : जयवंत शेट्टे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे डॉजबॉल स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महापालिका यांच्या वतीने जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने यश प्राप्त केले.



१९ वर्षाखालील गटात रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. या संघात आर्यन पावशे, कार्तिक गोपन, दिग्विजय नेटके, अभय सिंग, आनंद परते, क्रिश गोपाळे, ऋषी पाटील, आदित अत्तर, उदयन शिंदे, प्रथमेश पाटील यांचा समावेश होता. त्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील आणि संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी आणि क्रीडा शिक्षक यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य निशा नायर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रॉक स्टार्स संघाने जिंकला अग्रवंश चषक




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल, नवी मुंबईतील अग्रवंश समाजाच्या वतीने खारघर येथे आयोजित करण्यात आलेल्या अग्रवंश प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेतील अग्रवंश चषक २०२३ हा रॉक स्टार्स संघाने जिंकला.

अग्रहरी समाजातील तरुणांना खेळातून प्रोत्साहन देण्यासाठी, समाजातील तरुणांना एकसंघ करण्याच्या उद्देशाने अग्रवंश प्रीमियर लीग अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन खारघर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत १० संघांनी सहभाग घेतला. जेएसबी बॉईज संघ उपविजेता ठरला, तर द मॅव्हेरिसिक्स संघाने तिसरा क्रमांक प्राप्त केला. मालिकावीराचा किताब राहुल वैश्य याने पटकावला.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राजेश गुप्ता, मोहित अग्रवाल, संजय जिंदाल, राकेश गुप्ता, रणजित वैश्य, अजय अग्रहरी, प्रदीप गुप्ता, वैभव अग्रवाल आदींनी विशेष मेहनत घेतली. अग्रहरी समाजाचे तथा सक्षम प्रॉपर्टीजचे राजेश गुप्ता तसेच जय जिंदाल आणि वैभव अग्रवाल यांनी स्पर्धेसाठी विशेष योगदान दिले.



# श्री स्वामी नारायण गुरूकुल स्कूलचे विविध स्पर्धांत यश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक येथील श्री स्वामी नारायण गुरूकुल आंतरराष्ट्रीय विद्यालयाने विविध स्पर्धांमध्ये यश प्राप्त केले आहे. याबद्दल या संघांची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



गुरूकुल स्कूलने रसायनी पिल्लई स्कूल येथे झालेल्या जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत १४ वर्षे वयोगटामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे लोधिवली येथील रिलायन्स फाऊंडेशन स्कूल या ठिकाणी झालेल्या १७ वर्ष वयोगटातील शालेय विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत खोपोली कारमेल स्कूल संघाला १० गुणांनी नमवून विजय प्राप्त केला.

याबद्दल यशस्वी विद्यार्थी, त्यांचे कोच महेश जाधव, संकेत मसणे यांचे संस्थेचे संचालक विश्वमंगलदास स्वामी, ब्रम्हस्वरूप स्वामी, मुख्याध्यापक डॉ. पी. हरीबाबू यांनी कौतुक करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.







# मुंबईत रंगणार कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

गुड मॉर्निंग विरुद्ध संस्कृती आणि गोलफादेवी विरुद्ध अमर मंडळ (काळाचौकी) या कुमार गटातील उद्घाटनीय सामन्याने शिवनेरी सेवा मंडळ आयोजित स्व. मोहन राजाराम नाईक सुवर्ण चषक कबड्डी स्पर्धेला रविवारी (दि. १५) सायंकाळी ६ वाजता प्रारंभ होईल.

कोरोनाचा दोन वर्षांचा काळ वगळता गेली ५३ वर्ष मंडळ सातत्याने दादर (पूर्व) शिंदेवाडी येथील भवानी माता क्रीडांगणावर ही स्पर्धा आयोजित करीत आहे. या वर्षी मंडळाच्या वतीने विशेष व्यावसायिक गट, व्यावसायिक प्रथम श्रेणी, महिला व कुमार अशा विविध गटांत कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेष व्यावसायिक गटात १२, प्रथम श्रेणी व्यावसायिक गटात १६, कुमार गटात १६, महिला गटात १२ संघानी सहभाग नोंदविला आहे. विजेते, उपविजेते, उपांत्य उपविजयी (दोन संघ) या सर्वांना स्व. मोहन राजाराम नाईक चषक व गटानुसार रोख रकमेच्या पारितोषिकाने गौरविण्यात येईल. शिवाय स्पर्धेतील सर्वोत्तम, चढाई व पकड तसेच प्रतिदिनीचा मानकरी यांचाही सन्मान केला जाणार आहे.







**|| दुःखद निधन ||**



**वै. ह.भ.प. आनंदी शंकर पाटील**

यांचे शनिवार दि. ०७/१०/२०२३ रोजी दुःखद निधन झाले.
तरी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना
**दशक्रिया विधी (दहावा) सोमवार दि. १६/१०/२०२३ रोजी श्रीक्षेत्र नाशिक येथे होणार आहे.**
**व उत्तरकार्य (तेरावा) गुरुवार दि. १९/१०/२०२३ रोजी राहत्या घरी नेरे येथे होणार आहे.**

**शोकाकुल**

श्री. दत्तात्रेय शंकर पाटील श्री. संजय शंकर पाटील
श्री. संभाजी शंकर पाटील
श्रीमती राजश्री राजाराम म्हस्कर
सौ. संगिता प्रल्हाद पाटील सौ. रजनी भरत ठाकूर
व पाटील परिवार, नेरे

टिप : कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्विकारले जाणार नाही तसेच कोणीही जेवण आणू नये.
मु. पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड.

**कार्यक्रम**

| | |
|---|---|
| रविवार दि. १५/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा. | **श्री विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ, वाजे** बुवा –हरिचंद्रबुवा वाजेकर, पखवाज – संतोष मसणे, तबला – यश भोईर |
| सोमवार दि. १६/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा | **श्री ग्रामदेवता प्रासादिक भजन मंडळ, नेरे** बुवा – रुपेश पाटील, पखवाज – परेश पाटील, तबला – कल्पेश पाटील |
| मंगळवार दि. १७/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा. | **श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, जामरुग–बीड** बुवा – केशवबुवा तांडेल, पखवाज – हरिष मिसाळ |
| बुधवार दि. १८/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा | **श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, पारगांव** बुवा – शशिकांतबुवा पारगांवकर, पखवाज –धनंजय खुटले, तबला – शुभम सकपाळ |
| सायं. ९.०० ते ११.०० वा. | **श्री डांगरणेश्वर प्रासादिक भजन मंडळ, मोरवे** बुवा – महेशबुवा पाटील, सुरेश उलवेकर, रामदास म्हात्रे, रमेश नावडेकर, पखवाज उत्तम उलवेकर, मोहन शेळके |

गुरुवार दि. १९/१०/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० वा.
**किर्तन – ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर महाराज पारधी (वांद्रे–शहापूर)**
पखवाज – धनंजय खुटले (नेरेपाडा)

